cmyk

## संपादकीय

### पाऊस नाही, प्रशासनच अपयशी !

महाराष्ट्रात मान्सून सुरू झाला की प्रशासनाच्या विकासाच्या दाव्यांचा फुगा फुटतो. मुंबईपासून नाशिकपर्यंत, पुण्यापासून छत्रपती संभाजीनगरपर्यंत प्रत्येक शहराची तीच अवस्था. काही तासांचा पाऊस पडला की रस्ते नद्यांमध्ये बदलतात, सखल भाग पाण्याखाली जातात, घरांमध्ये सांडपाणी शिरते, नव्याने बांधलेले रस्ते उखडतात आणि वाहतूक कोलमडते. यानंतर नेहमीचा बहाणा पुढे केला जातो. ''अतिवृष्टी झाली.'' प्रत्यक्षात हा पावसाचा नव्हे, तर भ्रष्टाचाराचा आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा महापूर असतो.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०९ | गुरूवार दि.०८ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### पुण्यात २४ तासांत १२१ मिमी पाऊस

पुणे :शहरात मंगळवारी सुद्धा अतिवृष्टीसदृश पाऊस झाल्याने अवघ्या २४ तासांत अनेक भाग जलमय झाले. शहरात १२१ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, १२६ ठिकाणी पाणी साचल्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. धोक्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने तातडीने कारवाई करत १,०४० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले. शहरातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेची यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असून, सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून मदत व बचावकार्य सुरू आहे.महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सर्वाधिक २०६.५० मि.मी. पावसाची नोंद झाली. त्यापाठोपाठ औंध–बाणेर परिसरात २०३.५० मि.मी., तर कात्रज–कोंढवा भागात १८६.५० मि.मी. पाऊस झाला. या भागांसह शहरातील अनेक सखल वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

### नाशिक–त्र्यंबकेश्वरचा संपर्क तुटला!

नाशिक :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नाशिकला ढगफुटीची भीती व्यक्त केली होती. ढगफुटी टळली मात्र मुसळधार पावसाने नाशिकला झोडपले. काल रात्रभर पावसाने नाशिक शहरात हाहाकार उडाला.मुसळधार पावसाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहर आज पुन्हा पाण्याखाली गेले. सबंध शहरात गोदावरी, नंदीनी नदीचा पूर आणि पावसाचे पाणी वाहत होते. त्र्यंबकेश्वर परिसरात पुराच्या पाण्याने दुरावस्था झाली. शहरातील शाळांना सुटी जाहीर करावी लागली.नाशिक, त्रबकेश्वर आणि घोटी शहराला जोडणारा नवा पूल बांधण्यात आले होते. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे हा पूल वाहून गेला. त्यामुळे त्र्यंबकेश्वर चा संपर्क तुटला. या परिसरात अनेक ठिकाणी गावे आणि शेती पाण्याखाली गेली. मुसळधार पावसाने नाशिक शहरातील जनजीवन ठप्प झाले गोदावरी नदीला पूर आला. दुतोंड्या मारुतीच्या गळ्यापर्यंत पाणी पोहोचले होते. पाण्याचे संकट टळले, मात्र पावसाने संकट निर्माण केले.

### सुरतच्या रस्त्यांवर गाड्या तरंगू लागल्या

जयपूर : गुजरातच्या सुरतमध्ये ३६ तासांत १८ इंच पावसाची नोंद झाली. यामुळे जुलै १९४१ मध्ये नोंदवलेला १८ इंच पावसाचा ८५ वर्षे जुना विक्रम मोडला गेला. शहरात सर्वत्र पाणी तुंबलं असून फ्लाय ओव्हरमध्येही पाणी भरलं आहे. एका शॉपिंग मॉलचा एक मजला पाण्याखाली गेला आहे आणि रस्त्यांवर गाड्या तरंगत आहेत. शहराचा कोणताही भाग निर्जन राहिला नाही. सुरतमध्ये विजेचा धक्का, झाडे कोसळल्याने आणि वीज पडून नऊ जणांचा मृत्यू झाला. पुराच्या पाण्यात अडकलेल्या ३,४०० लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. सुरत आणि जवळच्या नवसारी परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्या बंद आहेत. लोकांना केवळ अत्यावश्यक कामासाठीच घराबाहेर पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.


# शेतकरी असल्याचा पुरावा दिल्याशिवाय जमीन घेता येणार नाही...!

## राज्य शासनाने भूमिका स्पष्ट केली, जमीन खरेदी–विक्रीवर होणार परिणाम

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात शेतकरी नसताना शेतजमीन खरेदी करण्याचे प्रकार सुरु आहेत. त्यासाठी कोणत्याही परप्रांतीय व्यक्तीला आमच्या राज्यात शेतकरी असल्याचा पुरावा दिल्याशिवाय जमीन घेता येणार नाही, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. ८ जुलै) विधानसभेत सांगितले. धुळे शहराचे भाजप आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर महसूलमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.**

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ६३ आणि ८४ सी नुसार कृषी जमीन केवळ पात्र शेतकऱ्यांची राहावी, अशी तरतूद आहे. पण धुळे तालुक्यात या कायद्याचे उल्लंघन झाले आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी बिगर शेतकऱ्यांनी खरेदी केल्या असल्याचे अग्रवाल यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, कुळ कायद्यातील तरतुदीनुसार राज्यातील एखादी जमीन घ्यायची असेल तर तो शेतकरी असायला हवा. राज्यात शेतकरी नसताना जमीन खरेदी करण्याचे प्रकार चालू आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोपा विमानतळ झाला. मोपा विमानतळाच्या



बाजूला दोडामार्ग तालउुक्यात राज्याबाहेरच्या लोकांनी येऊन मोठ्या प्रमाणात जमिनी घेतल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. शेतकरी नसताना राज्यातील किती जमिनी, कोणी विकत घेतल्या आहेत? यासाठी राज्याचे संपूर्ण मॅपिंग करणार आहोत. त्याची कारवाई सुरु करत आहोत. कोणी रजिस्ट्री करण्यासाठी आल्यानंतर त्याच्या नावावर राज्यात कुठे सात–बारा नावावर आहे काय? याचा माहिती मिळावी, यासाठी मुद्रांक अधिकाऱ्यांना जमाबंदी आयुक्तांकडून सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यात परप्रांतीयांनी जमिनी घेतल्या असतील तर चौकशी केली जाईल. एकूण गट १० आणि दस्तसंख्या १३ झाली आहे. शेतकरी असल्याचे सात लोकांकडे पुरावे आहेत. तर २ लोकांकडे पुरावे नाहीत. याची चौकशी केली जाईल, असे आश्वासन मंत्री बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. ▶▶ पान २ वर

# शरद पवार अचानक विधान भवनात

## महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादाबाबत बैठक



मुंबई । प्रतिनिधी

**राज्य विधीमंडळाचं सध्या पावसाळी अधिवेशन सुरु आहे. महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते शरद पवार हे आज विधान भवनात दाखल झाले आहेत. विधान भवनात आज एक अतिशय महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावादाबाबत ही बैठक या बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मंत्रिमंडळातील ज्येष्ठ नेतेदेखील हजर होते या बैठकीत सीमा वादावर तोडगा काढण्यासंदर्भात चर्चा झाली .**

शरद पवार विधान भवनात दाखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील विधान भवनात दाखल झाले. ते सुद्धा महाराष्ट्र–कर्नाटक समीवादाशी संबंधित बैठकीत सहभागी होण्यासाठी आल्याची माहिती मिळत आहे. एकनाथ शिंदे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. ठाण्यातील ज्युपीटर हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. आजारपणावर मात करुन ते आज विधान भवनात दाखल झाले.एकनाथ शिंदे आज विधान भवनात दाखल झाल्यानंतर एक अनोखी घटना घडली. ▶▶ पान २ वर

# मिसिंग लिंक वरून मुख्यमंत्री संतापले

## महाराष्ट्राची बदनामी करणाऱ्यांना सोडणार नाही

मुंबई । प्रतिनिधी

**मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यानंतर काही लोकांनी सरकारवर अवाजवी टीका केली. एक कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर हे लोक पैदा झाले असतील. त्यांना खोटं बोलायला लाजही वाटत नाही. मात्र, या सगळ्यांच्या नाकावर टिच्चून सरकारने १८ तासांत मिसिंग लिंकवरील वाहतूक पूर्ववत केली. भविष्यात मिसिंग लिंकवरुन आमच्यावर टीका करणारे शिल्लक राहणार नाहीत. पण १० वर्षांनी मिसिंग लिंक असेल, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंचं नाव असेल. मला बदनाम करा पण महाराष्ट्राला बदनाम करु नका, अशा**



**आक्रमक भाषेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिले. ते बुधवारी विधानसभेत बोलत होते.**

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मिसिंग लिंकवरुन टीका करणाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. ज्यांना कुत्रा नाही विचारत, ते आज सोशल मीडियावर येऊन सगळ्यांना शिव्या देत आहेत. असे भाड्याचे तट्टू मिसिंग लिंकबाबत पैसे घेऊन सोशल मीडियावर लिहत होते. या सगळ्यांना मी एकच सांगतो की, महाराष्ट्राचा अपमान कराल तर मी सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीसांनी ठणकावून सांगितले. मिसिंग लिंकवर दरड कोसळण्याच्या घटनेने आपण काही गोष्टी शिकलो. पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो, दर कशी कोसळू शकते, हे आपल्याला लक्षात आले. त्यामुळे आता आपण आयआयटीमधील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन नव्या उपाययोजना करणार आहोत. जेणेकरुन कदाचित पुढच्यावर्षी अशी घटना घडणार नाही, ▶▶ पान २ वर

### ऑनड्युटी पोलीस कर्मचाऱ्याने संपवलं जीवन

मुंबई । प्रतिनिधी

अतिसुरक्षित समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र लोकभवन परिसरात स्टेट रिझर्व्ह पोलिस फोर्स म्हणजेच एसआरपीएफ जवानाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कोल्हापूर येथील एसआरपीएफ ग्रुप–१६ मध्ये कार्यरत असलेले कॉन्स्टेबल अमलदार कौस्तुभ सांगळे ड्युटीवर असताना ही घटना घडली. प्राथमिक तपासात वैयक्तिक आयुष्यातील तणाव हा या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून एक सुसाइड नोट जप्त केली असून तिचा बारकाईने अभ्यास केला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, ▶▶ पान २ वर

# एसटीला अर्थ खात्याचा आखडता हात

## ■ मागणी ४१० कोटीची मिळाले ४५ कोटी!

मुंबई । प्रतिनिधी

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसून महामंडळाचा कारभार तोट्यात सुरू आहे. एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत असल्याने काही अंशी दिलासा मिळत असे. मात्र, मागील काही महिन्यांपासून एसटी महामंडळाला आर्थिक मदतीचा हातभार अर्थ खात्याने कमी



केला आहे. एसटी महामंडळाला ४१० कोटींची आवश्यकता असताना दुसरीकडे ४५ कोटीच मंजूर झाले आहेत.

एसटीने नोव्हेंबर २०२५ पासूनच्या वेतनवाढीच्या फरकापोटी ▶▶ पान २ वर

### बाहेर पावसाच्या सरी सभागृहात सरकारवर फैरी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात गेल्या चार दिवसापासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. मुंबई, पुण्यातील जनजीवन पावसामुळे विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे मुंबई–पुणे महामार्ग व रेल्वेमार्ग बंद पडला आहे. तर पावसामुळे मोठे नुकसान झाल्याने विधानसभेत पावसाच्या मुद्द्यावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहवयास मिळाले. सभागृहाच्या बाहेर पावसाच्या जोरदार सरी तर आत सत्ताधाऱ्यांवर विरोधकांच्या फैरी आज पहावयास मिळाल्या सभागृहात पावसावरून गदारोळ केला जात असल्याने सभागृहाचे कामकाज पाच मिनिटासाठी तहकूब करण्यात आले.

राज्यात गेल्या चार दिवसापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे नुकसान झाले आहे. ▶▶ पान २ वर

# खासगी क्लासेसला दणका!

## हिवाळी अधिवेशनात नवा कायदा?

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकार येत्या हिवाळी अधिवेशनात खासगी क्लासेसचे नियमन व नोंदणीसाठी स्वतंत्र कायदा आणणार आहे. शासनमान्य शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात खासगी क्लासेस चालविण्यास परवानगी दिली जाणार नाही, अशी महत्त्वाची तरतूद या कायद्यात समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली.



आ. कृपाल तुमाने व डॉ. मनीषा कायंदे यांनी राज्यात खासगी क्लासेसकडून दिशाभूल करण्याच्या जाहिराती, खोट्या यशोगाथा व निकालांचा गैरवापर करून विद्यार्थी व पालकांची लूट करण्यात येत असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली. अशा खासगी क्लासेसवर बंदी घालण्याची मागणी त्यांनी केली. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुसे म्हणाले, राज्यातील खासगी शिकवणी व्यवसायासाठी ▶▶ पान २ वर

# आंदोलन केल्यास वेतन कपात

## ■ राज्याच्या शिक्षण विभागाचा शिक्षकांना इशारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांचे शिक्षण, शाळा व शिक्षकांच्या मूलभूत मागण्यांकडे शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या विरोधात गुरुवार, ९ जुलै २०२६ रोजी राज्यातील शिक्षकांनी 'शाळा बंद' आणि 'सामूहिक रजा' आंदोलन पुकारले आहे. मात्र, या आंदोलनाची दखल घेत शिक्षण विभागाने कडक भूमिका घेतली असून, आंदोलन करणाऱ्या आणि शाळा बंद ठेवणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांच्या माहितीनुसार, शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन केले जात आहे. त्यांच्या मुख्य मागण्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,४७० | २,८६१ | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड : ८५.०० क्विंटल | २,१७० | ५,००० | २,८३५ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | २,२२६ | २,२२६ | २,२२६ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,२०० | २,९०० | २,५५८ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,२०० | ५,५८० | ५,३९० |

# ट्रम्प तात्याच्या एक घोषणानं गुंतवणूकदारांचे ८ लाख कोटी बुडाले

मुंबई । प्रतिनिधी

**भारतीय शेअर बाजारात दुपारनंतर अचानक मोठी घसरण सुरु झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर करताच सेन्सेक्स आणि निफ्टी क्रॅश झाले. निफ्टी ५० निर्देशांक २३८९७ अंकावर बंद झाला, तर, सेन्सेक्स १६५८ अंकांनी घसरुन ७६५२२ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टीमध्ये १४५८ अंकांची घसरण होऊन निर्देशांक ५६७४२ वर बंद झाला.**

बीएसईवरील आकडेवारीनुसार आज गुंतवणूकदारांचं तब्बल ८ लाख कोटी



रुपयांचं नुकसान झालं आहे. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४८० लाख कोटींवरुन घसरुन ४७२ लाख कोटींवर आलं आहे. म्हणजेच जवळपास गुंतवणूकदारांचं एका दिवसात ८ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. शेअर बाजारातील प्रमुख १६ सेक्टर्स पैकी १३ सेक्टरमध्ये घसरण झाली. स्मॉल कॅप आणि मिड कॅप ०.०३ टक्क्यांनी घसरले.भारतीय शेअर बाजाराची आजची सुरुवात घसरणीसह झाली होती. दुपारपर्यंत निर्देशांकावर दबाव होता. बँकिंग शेअरमधील घसरणीमुळं बँक निफ्टीत घसरणीसह ट्रेडिंग सुरु होतं. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुपारी इराण सोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर करताच क्रूड ऑईलचे दर ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. यामुळं शेअर बाजारात घसरण झाली.आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम झाल्यानं स्मॉल कॅप, लार्ज कॅप शेअरमध्ये देखील घसरण झाली. सर्वाधिक घसरण जिओ फायनान्शिअल, श्रीराम फायनान्स, इंटरग्लोब एविएशन, यूनियन बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी असेटस मॅनेजमेंट, मारुती सुझुकीच्या शेअरमध्ये घसरण झाली. निफ्टीच्या जवळपास सर्व निर्देशांकात घसरण झाली. निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक १.९७ टक्क्यांनी घसरला. तर, निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक १.५७ टक्क्यांनी घसरला. ऑईल अँड गॅस निर्देशांक १.५ टक्क्यांनी घसरला. शेअर बाजारात तेल विपणन कंपन्या, रंग बनवणाऱ्या कंपन्या, हवाई वाहतूक कंपन्या आणि टायर बनवणाऱ्या ▶▶ पान २ वर

### गावात स्मशानभूमी नाही मग विकास निधी विसरा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ग्रामीण भागात मरणानंतरही मरणयातना संपत नसल्याचे अत्यंत विदारक चित्र आहे. राज्यात आजही तब्बल ७ हजार ४४४ (२० टक्के) गावांमध्ये स्मशानभूमीच उपलब्ध नाही. परिणामी, पावसाळ्यात गुडघाभर पाण्यातून वाट काढत किंवा उघड्यावर अंतिम संस्कार करावे लागतात.त्यामुळे आता विकास कामासाठी येणाऱ्यांनी किंवा गावच्या सरपंचानी गावात समशानभूमी आहे असे प्रमाणपत्र जोडावे लागणार तरच विकास कामाचा निधी दिला जाईल असा इशारा ग्रामविकास विभागाचे मंत्री गोरे यांनी दिला आहे. राज्यातील स्मशानभूमींच्या दुरवस्थेवर आणि उपलब्धतेवर बोलताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, राज्यात २० टक्के गावांमध्ये स्मशानभूमी नसणे, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पाऊस नाही, प्रशासनच अपयशी !

महाराष्ट्रात मान्सून सुरू झाला की प्रशासनाच्या विकासाच्या दाव्यांचा फुगा फुटतो. मुंबईपासून नाशिकपर्यंत, पुण्यापासून छत्रपती संभाजीनगरपर्यंत प्रत्येक शहराची तीच अवस्था. काही तासांचा पाऊस पडला की रस्ते नद्यांमध्ये बदलतात, सखल भाग पाण्याखाली जातात, घरांमध्ये सांडपाणी शिरते, नव्याने बांधलेले रस्ते उखडतात आणि वाहतूक कोलमडते. यानंतर नेहमीचा बहाणा पुढे केला जातो. ''अतिवृष्टी झाली.'' प्रत्यक्षात हा पावसाचा नव्हे, तर भ्रष्टाचाराचा आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा महापूर असतो.

प्रत्येक वर्षी नालेसफाईच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची बिले मंजूर होतात. रस्ते दुरुस्तीवर आणि विकासकामांवर हजारो कोटी खर्च झाल्याचे सांगितले जाते. मग पहिल्याच पावसात नाले तुंबतात कसे? रस्ते खचतात कसे? पूल आणि गटारे अपयशी का ठरतात? याचे उत्तर एकच कामे कागदावर दर्जेदार आणि प्रत्यक्षात निकृष्ट असतात. भ्रष्ट कंत्राटदार, त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत नसलेली व्यवस्था यामुळेच नागरिकांना दरवर्षी ही शिक्षा भोगावी लागते.

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाखाली विकासकामांचा धडाका सुरू आहे. रस्ते खोदले आहेत, भुयारी गटारांची कामे अर्धवट आहेत, वाहतूक विस्कळीत झाली आहे. शहर विकासाच्या प्रक्रियेत असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात नियोजनाचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. पहिल्याच पावसात अनेक भागांत पाणी साचू लागले आहे. म्हणजे कोट्यवधी रुपयांची कामे सुरू असतानाच त्यांतील त्रुटी उघड होत आहेत. ही लाजिरवाणी बाब आहे. आश्चर्य म्हणजे या अपयशाची जबाबदारी कोणी स्वीकारत नाही. अधिकारी हवामानाला दोष देतात, लोकप्रतिनिधी अधिक निधीची मागणी करतात आणि कंत्राटदार पुढील कामांच्या निविदा मिळवण्यात व्यस्त असतात. चौकशीच्या घोषणा होतात; पण दोषींवर कठोर कारवाई होत नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराला अभय मिळते आणि निकृष्ट कामांची पुनरावृत्ती सुरूच राहते.

चालू पावसाळा हा प्रशासनासाठी इशारा आहे. वरिष्ठ अभियंते वातानुकूलित कार्यालयात बसून अहवाल वाचण्यापेक्षा पावसात रस्त्यावर उतरले पाहिजेत. कुठे पाणी साचते, कुठे निचरा थांबतो, कुठे रस्त्यांचे उतार चुकीचे आहेत, कुठे गटारे अपुरी पडतात याचे प्रत्यक्ष निरीक्षण करून तातडीने सुधारणा केल्या पाहिजेत. अन्यथा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या वेळी लाखो भाविकांसमोर नाशिकची मानहानी होईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावरच असेल. आता केवळ निलंबनाच्या आणि चौकशीच्या घोषणा करून भागणार नाही. निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकणे, संबंधित अभियंत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि सार्वजनिक पैशाची वसुली करणे हीच खरी सुधारणा ठरेल. करदात्यांच्या पैशावर भ्रष्टाचार करणाऱ्यांना संरक्षण देणारी व्यवस्था बदलल्याशिवाय प्रत्येक पावसाळा नागरिकांसाठी संकट आणि भ्रष्टांसाठी कमाईचा हंगाम ठरत राहील. पाऊस हा शत्रू नाही; शत्रू आहे तो भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि उत्तरदायित्वाचा अभाव. यावर कठोर प्रहार झाला तरच शहरांचा खरा विकास होईल. अन्यथा दरवर्षी वाहून जाणार ते केवळ डांबर आणि पूल नसतील, तर जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील उरलेलाही विश्वास असेल.

## महावितरणच्या दोषामुळे शेतकरी पचत्राचा मृत्यू; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि वारसाला शासकीय नोकरी द्या

# आ.संदीप क्षीरसागर सभागृहात आक्रमक



**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड मतदारसंघातील मौजे हाजीपूर (ता. शिरूर का.) येथील एक अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. शेतात काम करत असताना वीज धक्क्याने (करंट लागून) तरुण शेतकरी कृष्णा उगले यांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा सर्व प्रकार महावितरण विभाग आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे घडला असून, दोषींवर तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान केली आहे.**

हाजीपूर (ता.शिरूर का.) येथे महावितरण विभागाचे काम सुरू होते. काम सुरू असताना तिथे सुरक्षेची कोणतीही आवश्यक ती काळजी आणि खबरदारी महावितरणचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याकडून घेतली गेली नाही. विशेष धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित शेतकऱ्याने ६ जून २०२६ रोजीच महावितरण विभागाकडे शेतातील निकामी पोल आणि धोकादायक तारा काढून घेण्याबाबत रीतसर अर्ज केला होता. मात्र, महावितरणच्या प्रशासनाने या अर्जावर वेळेत कोणतीही कारवाई केली नाही. प्रशासनाच्या याच दिरंगाईमुळे आज एका निष्पाप तरुण शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला आहे. दरम्यान, सदरील प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी आणि कंत्राटदारावर कडक कायदेशीर कारवाई व्हावी. मृत कृष्णा उगले यांच्या कुटुंबाला शासनाकडून आणि महावितरणकडून तात्काळ मोठी आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे निष्पाप शेतकऱ्याचा बळी गेल्याने बीड जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत असून, आता यावर शासनाकडून तातडीने निर्णय घेण्याची मागणी आ.क्षीरसागर यांनी केली आहे.

### कुटुंबावर दु:खाचा डोंगर; एका वर्षात दुसरा मुलगा गमावला

मृत कृष्णा उगले यांना दोन भाऊ होते. त्यापैकी एका भावाचा गेल्या वर्षी पुणे येथे अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. आता कृष्णा यांच्याही जाण्याने वृद्ध आई-वडिलांचा मोठा आधार हिरावला गेला आहे. त्यांचा तिसरा भाऊ सुशिक्षित बेरोजगार असून, या वृद्ध माता-पित्याला आधार देण्यासाठी आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्याला शासकीय सेवेत सामावून घेणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मागणी केली आहे.

### मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे, उपमुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून मागणी

आ.संदीप क्षीरसागर यांचा हाजीपूर येथील प्रकरणात पाठपुरावा सुरू आहे. आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ६ जुलै २०२६ रोजी पत्राद्वारे माहिती देऊन योग्य कार्यवाहीची मागणी केली आहे. तसेच उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची बुधवारी (दि.८) रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन सदरील प्रकरणाची माहिती देऊन दोषींवर कठोर कारवाई आणि पीडित कुटुंबाला जास्तीत जास्त शासकीय मदत मिळवून देण्याची मागणी केली आहे.

# एसआयआर कामातून शिक्षकांची सुटका करा

## अनिलदादा जगताप यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी!

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षकांवर सोपविण्यात आलेल्या एसआयआर मॅपिंग कामामुळे शैक्षणिक कामकाजावर गंभीर परिणाम होत असून शिक्षकांवरील मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक ताण वाढत आहे. त्यामुळे शिक्षकांना एसआयआरच्या कामातून कायमस्वरूपी मुक्त करून हे काम इतर शासकीय किंवा निमशासकीय यंत्रणेमार्फत राबविण्यात यावे, अशी मागणी शिवसेना आणि शिक्षकसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात शिक्षकांकडून एसआयआर अंतर्गत मॅपिंगसह विविध अतिरिक्त कामे करून घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षकांवर मानसिक व शारीरिक ताणही वाढत आहे. तसेच पाटोदा येथील महिला शिक्षिका आणि गेवराई तालुक्यातील शिक्षक योगेश बुंदेले यांच्याशी संबंधित घडलेल्या घटनांचा उल्लेख करत शिक्षकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. शिवसेनेने निवेदनातून काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये २९ जुलैनंतरचे एसआयआर मॅपिंगचे काम पूर्णपणे बंद करणे, शिक्षकांची एसआयआर कामातून कायमस्वरूपी मुक्तता करणे, एसआयआर मॅपिंगचे काम करणाऱ्या शिक्षकांवर गुन्हे दाखल न करणे तसेच अधिकाऱ्यांकडून गुन्ह्यांची धमकी देऊन मानसिक छळ करू नये, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय महिला शिक्षकांना सायंकाळी ६ नंतर च्या कामासाठी पाठवू नये, त्यांच्या सुरक्षिततेची व सन्मानाची हमी द्यावी, एसआयआर मॅपिंग साठी अधिकृत कामकाजाची वेळ निश्चित करावी, बीएलओ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बैठक व कामकाजाची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही निवेदनात करण्यात आल्या आहेत. उच्च माध्यमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांना बोर्ड परीक्षेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या कामातून वगळावे, जनगणनेच्या धर्तीवर एसआयआर मॅपिंगचे काम करणाऱ्या शिक्षकांना अर्जित रजा मंजूर करावी, ऑन-ड्युटी बीएलओ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा किमान १० लाख रुपयांचा विमा उतरवावा, तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित अबाधित राहण्यासाठी एसआयआर मॅपिंगचे काम इतर शासकीय अथवा निमशासकीय यंत्रणेकडे तात्काळ हस्तांतरित करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. वरील सर्व मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक व सकारात्मक विचार करून तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हा संघटक सुनिल सुरवसे, उप जिल्हाप्रमुख अजय जाधव, शिक्षकशेना जिल्हाप्रमुख दत्तात्रय कवचट सर, शिक्षकनेते सुनीलजी कुर्लेकर सर, राजेंद्रजी खेडकर सर शिक्षकसेनेचे जिल्हाउपाध्यक्ष गणेश खेडकर सर, गोरक्ष तळेकर, प्रा . निलेश खेडकर सर, आकाश जगताप, प्रतिक कांबळे उपस्थित होते.

# सिईओ जितीन रेहमान यांची जि.प.आर्दश शाळा आमला भेट

**मादळमोही । प्रतिनिधी**

जि.प.आदर्श प्राथमिक शाळा आमला ता. गेवराई येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जितिन१ रहमान साहेब, शिक्षण अधिकारी मा. मयुरेश मोरे साहेब यांनी शाळेला भेट देऊन शाळेमध्ये सुरू असलेली विविध विकासकामे, शाळेत उभारलेली एसटिईएम लॅब, आयसिटी लॅब यांची पाहणी केली. सर्वप्रथम साहेबांनी एसटिईएम लॅबला भेट देऊन तिथे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी त्यांचे अध्ययन प्रभावी आणि परिणामकारक होण्यासाठी या लॅबचे शैक्षणिक महत्त्व साहेबांना सांगितले. लॅब मध्ये असलेली विविध विज्ञान, गणितआणि तंत्रज्ञानाचे मॉडेल्स कसे हाताळायचे आणि या साधन साहित्याचा वापर करून वैज्ञानिक दृष्टिकोन कसा निर्माण होतो, त्याचबरोबर विविध स्पर्धा परीक्षा आणि त्यातून नाशा व ईसरो इथे जाण्याची संधी याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देऊन विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासाची सवय जोपासावी असे साहेबांनी सांगितले. आयसिटी लॅब मधील संगणक हे केवळ यंत्र नसून ते उज्वला भविष्याकडे नेणारी प्रभावी साधन आहेत असे गौरवोदगार याप्रसंगी माननीय साहेबांनी काढले .यानंतर शाळेच्या भौतिक सुविधा आणि शालेय परिसरात सुरू असलेले



सुशोभीकरण व इतर विकासकामे यांची प्रत्यक्ष पाहणी करून ही सर्व कामे वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी यांना सूचना देऊन सरपंच आणि उपस्थित गावकरी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्याशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांनी गणित विज्ञान या विषयाचे विविध मॉडेल्स आणि शैक्षणिक साहित्याचे आत्मविश्वास पूर्ण सादरीकरण केले. विद्यार्थ्यांचा आत्मविनश्वास, प्रभावी संवाद कौशल्य, जिज्ञासा, चिकित्सक विचार हे पाहून शिक्षण अधिकारी श्री मोरे साहेब यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, नियमित अभ्यास याचे महत्त्व पटवून देऊन याच जोरावर आपली स्वप्न पूर्ण करण्याचा मोलाचा संदेश देऊन शाळेतील विद्यार्थ्यांची प्रगती आणि त्यासाठी शाळेने राबवलेल्या विविध प्रभावी उपक्रम व त्यांची अंमलबजावणी यासाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक आणि गावकरी यांचे अभिनंदन केले . कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा बीड श्री बाहेगावकर साहेब यांनी शाळेतील विकास कामासंदर्भात उपस्थितीत इंजिनिअर, ग्रामसेवक, सरपंच यांना योग्य त्या सूचना दिल्या. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शा. व्य. स. अध्यक्ष, सरपंच उपसरपंच, चेअरमन सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांच्या भेटीमुळे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा आमला आपल्या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे शैक्षणिक गुणवत्तेकडे वाटचाल करत असल्याबद्दल सर्व विद्यार्थी शिक्षक ग्रामस्थ यांनी समाधान व्यक्त केले.

### आम्ला जि,प.शाळेचा प्रवास प्रेरणादायी!

गेवराई तालुक्यातील आम्ला प्राथमिक शाळा एक आर्दश शाळा म्हणून पुढे येत आहे, येथिल शिक्षकांनी ज्ञानार्जन तर केलेच पण विद्यार्थीना विविध स्पर्धा परीक्षा च्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे मोठे काम केले आहे,या शाळेची प्रेरणा इतर जि,प.शाळेनी घेतल तर नक्कीच जि.प.शाळेकडे पालकांचा कल वाढेल .

## पान १ वरून...

### शेतकरी असल्याचा पुरावा दिल्याशिवाय

सरकारच्या या निर्णयामुळे शेतकरी नसतानाही व्यवसायिक दृष्टीने शेती खरेदी करून तिचा व्यापार करण्याच्या प्रकारावर आळा बसणार आहे. राज्यामध्ये अनेक ठिकाणी परराज्यासह राज्यातीलच अनेक व्यापाऱ्यांनी अशा पद्धतीने जमिनी खरेदी केल्या असून, केवळ नफेखोरी साठीच असे प्रकार होत असल्याचे समोर आले आहे. मात्र सरकारच्या या भूमिकेमुळे अशा लोकांना आता चाप बसणार आहे.

---------------

### मिसिंग लिंक वरून

असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. महायुती सरकारमध्ये हिंमत होती म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक बांधून दाखवली. कोकण रेल्वेही तशीच सुरु केली. तेव्हाही ही रेल्वे चालू शकणार नाही, असे म्हटले जायचे. मात्र, मधू दंडवते नावाच्या माणसाने हिंमत दाखवून कोकण रेल्वे सुरु केली. त्यानंतर सतत १५ वर्षे पावसाळ्यात कोकण रेल्वे मार्गावर दरड कोसळत होती. आपण प्रत्येकवेळी शिकायचो आणि काम करायचो. त्यावेळी घाबरुन कोकण रेल्वे सुरुच केली नसती तर आज काय अवस्था असती? मिसिंग लिंकचा इतिहासही असाच आहे. आघाडी सरकारमध्ये मिसिंग लिंकचा प्रस्ताव तयार झाला. तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी २ पानी पत्र लिहून १४ कारणं देऊन, मिसिंग लिंक होऊ शकत नाही, असे सांगून ती फाईल बंद केली. मात्र, आम्ही अधिकाऱ्यांशी आणि तज्ज्ञांशी बोललो, त्यांनी मिसिंग लिंक उभारणे शक्य असल्याचे सांगितले. आपण हे करुन दाखवलं. ही फक्त मिसिंग लिंक नाही तर इंजिनिअरिंग मार्व्हल आहे. हा भारतातील सर्वात उंच केबल स्टेड ब्रीज आणि जगातील सर्वात रुंद बोगदा आहे. ज्याठिकाणी १७० किमी प्रतितास वेगाने वारा वाहतो, तिकडे आपण मिसिंग लिंक बांधली. यामुळे घाटातील सर्व ट्रॅफिक संपले. मिसिंग लिंकवर जी दुर्घटना घडली, त्यामध्ये वरुन दरड कमानीवर कोसळली. मग खाली ढिगारा आला. त्यामुळे बोगद्याला काही अडचण आली नाही. प्रवाशांनी बोगद्यातील इमर्जन्सी बटण दाबल्यानंतर तीन मिनिटांत तिकडे क्रेन आली. प्रवाशांनी सांगितलं बोगदा होता म्हणून आम्ही वाचलो. पण काहींनी लगेच पाणी पडतंय, असे व्हिडीओ दाखवायला सुरुवात केली. जणू काही कनेक्टिंग लिंक तुटली, ७००० कोटी पाण्यात गेले, अशी टीका सुरु झाली. मात्र, या सगळ्यांच्या थोबाडावर टिच्चून आपण १८ तासांत मिसिंग लिंकवरील ट्रॅफिक सुरु केले, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

-----------------

### शरद पवार अचानक विधान

एकनाथ शिंदे यांनी विधान भवनात प्रवेश केल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार मिलिंद नार्वेकर त्यांना अचानक भेटले. यावेळी दोन्ही नेत्यांनी स्मितहास्य देत हस्तांदोलन केलं. विधान भवनाच्या पायऱ्यांवर दोन्ही नेते समोरासमोर आले. यावेळी मिलिंद नार्वेकर आणि शिंदे यांनी हस्तांदोलन केलं. यावेळी नार्वेकर यांनी एकनाथ शिंदे यांची तब्येतीची विचारपूस केली. यानंतर दोन्ही नेते आपापल्या मार्गाला लागले.कर्नाटक आणि महाराष्ट्र सीमावाद गेल्या अनेक वर्षांपासून आहे. नुकतंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली दौऱ्यावर गेले होते. दिल्ली दौऱ्यातून महाराष्ट्राला १० टीएमसी पाणी देण्यास गुजरात तयार असल्याची गुडन्यूज देवेंद्र फडणवीस घेऊन आले आहेत. तसेच महाराष्ट्राला नर्मदा प्रकल्पात केवळ २७ कोटी देणे असल्याचं बैठकीत ठरल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या वादावरचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर आता मुख्यमंत्री महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं सध्याचं चित्र आहे.

-------------

### बाहेर पावसाच्या सरी

त्यामुळे सरकारने या गंभीर परिस्थितीवर सभागृहात चर्चा करावी, यासाठी सत्ताधारी मंडळी आक्रमक झाली होती. राज्यात पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पूरपरिस्थितीमुळे राज्यातील जनता त्रस्त झाली आहे. त्यांना त्रास होत असल्याचे आमदार भास्कर जाधव यांनी स्पष्ट करीत याविषयावर चर्चा करण्याची मागणी लावून धरली.राज्यातील पूरस्थितीची राज्य सरकारला काळजी नाही, असा आरोप यावेळी काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी केला. तर याविषयावर चर्चा करण्याची मागणी केली जात असताना राज्य सरकार चर्चेला तयार नाही, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केला. यावेळी सभागृहात याच मुद्दयावरून सत्ताधारी व विरोधकानी गदारोळ केला.यावेळी याच मुद्द्यवरून सत्ताधारी व विरोधकानी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले. त्यामुळे सभागृहाचे कामकाज पाच मिनिटासाठी तहकूब करण्यात आले. त्यानंतर उद्या पावसाच्या नुकसानीबाबत चर्चा करू, असे आश्वासन विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले. त्यानंतर सभागृहातील गदारोळ थांबला.

----------------

### एसटीला अर्थ खात्याचा

राज्य सरकारकडे ४१० कोटी रुपयांची मागणी केली असताना केवळ ४५ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी देऊन अर्थ खात्याने 'राजा उदार झाला, हाती भोपळा दिला' अशीच भूमिका घेतल्याची टीका महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली.बरगे यांनी सांगितले की, एसटी कर्मचा-यांचे वेतन शासनाकडून मिळणा-या सवलत मूल्य प्रतिपूर्तीच्या रकमेतून दिले जाते. मे महिन्याची सवलत मूल्य प्रतिपूर्ती ४०५ कोटी रुपये इतकी असून या महिन्यात त्याव्यतिरिक्त शासनाने ४५ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी दिला आहे. मात्र, नोव्हेंबर २०२५ पासूनच्या वेतनवाढीच्या फरकासाठी मागितलेले ४१० कोटी रुपये अद्याप मंजूर झालेले नाहीत.या निधीसाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अर्थ खात्याकडे वारंवार लेखी व तोंडी पाठपुरावा केला. मात्र, त्याची दखल घेण्यात आली नाही. सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कम देण्यात आली पण त्या व्यतिरिक्त देण्यात आलेल्या ४५ कोटी रुपयांचा उद्देश काय, याचा खुलासा अर्थ खात्याने करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

--------------

### ऑनड्युटी पोलीस

एका महिला पोलिस कर्मचाऱ्याशी असलेल्या प्रेमसंबंधांमध्ये आलेल्या अडचणींमुळे सांगळे मानसिक तणावात होते, अशी शक्यता तपासात व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित महिला आणि मृत जवान हे दोघेही २०२४ मध्ये पोलीस दलात भरती झाले होते. लग्नास नकार मिळाल्यानंतर त्यांच्यावर मानसिक ताण वाढल्याचा तपासाचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, अंतिम निष्कर्ष तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.तपासादरम्यान कौस्तुभ सांगळे यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्याबाबतही माहिती समोर आली आहे. लहानपणी आईचे निधन, त्यानंतर वडिलांचे दुसरे लग्न आणि काही वर्षांपूर्वी बहिणीने आत्महत्या केल्यासारख्या घटना त्यांच्या आयुष्यात घडल्या होत्या. या पार्श्वभूमीचा त्यांच्या मानसिक स्थितीवर काही परिणाम झाला होता का, याचाही तपास पोलीस करत आहेत. तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित मूल्यांकन वेळेवर झाले होते का, याचीही चौकशी सुरू आहे.

-----------------

### आंदोलन केल्यास

अशैक्षणिक कामांतून मुक्ती: मागील १२ वर्षांपासून शिक्षकांना मतदार यादी पुनरीक्षण आणि सध्या सुरू असलेल्या '' च्या कामात जुंपले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे.शिक्षक अभियोग्यता परीक्षेतून सूट: सेवा पूर्व परीक्षा देऊनही शिक्षकांना या परीक्षेच्या नावाखाली वेठीस धरले जात आहे. तमिळनाडूच्या धर्तीवर स्वतंत्र आणि ऑफलाइन परीक्षा घेण्यात यावी.संच मान्यता धोरणाचा विरोध: १५ मार्च २०२४ च्या संच मान्यता धोरणामुळे ग्रामीण भागात तीन वर्गांना केवळ एकच शिक्षक मिळत असून, यामुळे ग्रामीण भागातील शाळा बंद पडत आहेत.या आंदोलनात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीसह, प्रहार शिक्षक संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, मुख्याध्यापक महामंडळ यांसारख्या अनेक संघटना सक्रिय सहभाग घेणार आहेत.मात्र, या आंदोलनाची दखल घेत शिक्षण विभागाने कडक भूमिका घेतली असून, आंदोलन करणाऱ्या आणि शाळा बंद ठेवणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश दिले आहेत.

-------------------

### खासगी क्लासेसला

स्पष्ट नियमावली तयार करून विद्यार्थी आणि पालकांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने नवा कायदा आणला जाणार आहे. विधेयकाचा मसुदा अंतिम टप्प्यात असून, कायदा व न्याय विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर तो सूचना व हरकतींसाठी सार्वजनिक केला जाईल. त्यानंतर येत्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात येईल.महाराष्ट्र सरकार आणि शिक्षण विभाग देखील शाळा-महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेस यांच्यातील साटेलोट्याविरुद्ध कठोर भूमिका घेत आहे. शाळेतील तसेच महाविद्यालयातील शिक्षक-प्राध्यापकांना खासगी क्लासेस घेण्यास कायद्याने बंदी आहे. असे आढळल्यास शिक्षक-प्राध्यापकांवर अगदी बडतर्फीपर्यंतची कठोर कारवाईची तरतूद आहे. ज्युनिअर कॉलेज आणि खासगी कोचिंग क्लासेस यांच्यातील ''इंटिग्रेटेड'' किंवा जोडीदार पद्धत बंद करण्यासाठी कायदा आणण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. अनेकदा अशा खासगी शिकवण्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव केला जात असल्याच्या तक्रारीही पालकांकडून नोंदवल्या जातात. त्याच पार्श्वभूमीवर आता असे क्लास शाळेच्या आवारामध्ये घेण्यावर बंदी घालण्याचा विचार राज्यातील सरकार करत असून तसा कायदाच आणला जाणार आहे.

-------------------

### गावात स्मशानभूमी नाही

हे आपल्यासाठी नक्कीच भूषणावह नाही. 'गाव तिथे स्मशानभूमी' ही भूमिका ग्रामविकास खात्याने हाती घेतली असून माझ्याच अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. इथून पुढे गावाच्या विकासासाठी आमदार फंड, डीपीसी किंवा २५-१५ योजनेतून जो निधी दिला जातो, तो वापरताना गावात स्मशानभूमी असल्याचा दाखला आधी द्यावा लागेल. स्मशानभूमी असल्याशिवाय गावात दुसरं कुठलंही काम मंजूर करता येणार नाही, असा जीआर शासनाने काढला असून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे.या चर्चेत भाग घेताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त करत सरकारला काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यांनी सभागृहात मागणी केली की, 'जगणं सुखाचं नाही, किमान मरण तरी सुखाचं करा! दिवंगत व्यक्तींना अखेरचा निरोप सन्मानाने देता यावा यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून महिला व बालकल्याण प्रमाणेच ३ टक्के निधी स्मशानभूमीच्या विकासासाठी राखीव ठेवावा. ग्रामपंचायतींकडे स्मशानभूमी विकसित करण्यासाठी निधी नसतो. त्यामुळे महसूल विभागाने त्यांच्या ताब्यातील शासकीय जमिनी स्मशानभूमीसाठी त्वरित उपलब्ध करून देण्याचे आदेश सर्व जिल्हाधिका-यांना द्यावेत.असे निर्देश देण्यात आले .

----------

### ट्रम्प तात्याच्या एक घोषणानं गुंतवणूकदारांच

कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण झाली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील शस्त्रसंधी संपल्याचं समोर येताच आशियाई बाजारांवर देखील दबाव पाहायला मिळाला. जपान, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, चीनच्या बाजारात देखील घसरण झाली आहे. इंडिया विक्स निर्देशांक १५ वर पोहोचला आहे.

---------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६


## थोडक्यात

### संघर्षातून सिद्ध झाले यश; उदय मधुकरराव खरात यांना इंग्रजी विषयात पीएच.डी.

गेवराई । प्रतिनिधी



अथक परिश्रम, अविरत अभ्यास, संशोधनाची अखंड साधना आणि ध्येयाप्रती असलेली अढळ निष्ठा यांच्या बळावर र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील इंग्रजी विभागाचे प्राध्यापक उदय मधुकरराव खरात यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठ, इंदौर (मध्य प्रदेश) येथून इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयासह गेवराई तालुका आणि बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उदय खरात यांनी Religious and Cultural -spects in Chetan Bhagat Novels: - Qualitative Study या विषयावर सखोल संशोधन करून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. आधुनिक भारतीय इंग्रजी साहित्यातील लोकप्रिय लेखक चेतन भगत यांच्या कादंबऱ्यांमधील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंचा गुणात्मक पद्धतीने अभ्यास करणारे हे संशोधन साहित्यविश्वासाठी मोलाचे मानले जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित, महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. रजनी शिखरे, उपप्राचार्य विजय सांगळे व प्रशांत पांगरीकर, इंग्रजी विभागप्रमुख अरुण मल्हारी जाधव, डॉ. राजेश शेषम, डॉ. बालाजी रूपणर, तसेच महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक, संशोधनात्मक व सामाजिक कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### आयटीआय प्रवेशासाठी ९ जुलै पर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे आयटीआय प्रवेशासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने दोन दिवसांची मदत वाढ दिली आहे. अतिवृष्टीमुळे रस्ते बंद झाल्याने आणि वाहतूक विस्कळीत झाल्याने विद्यार्थ्यांना संस्थांमध्ये जाऊन प्रवेश निश्चित केले कठीण झाले होते. ही गैरसोय लक्षात घेऊन आता विद्यार्थ्यांना ९ जुलै २०२६ गुरुवार रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करता येणार आहे. पहिल्या केंद्रीय प्रवेश फेरीत राज्यभरातील १ लाख ७० हजार ३९९ अर्जदारांपैकी ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांना प्रवेशांची संधी मिळाली. निवड झालेल्या या ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांपैकी मंगळवारी सायंकाळपर्यंत केवळ ३५ हजार ३९३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यामुळे जवळपास निम्म्याहून अधिक विद्यार्थी अद्याप प्रवेश प्रक्रिया पासून दूर आहेत. यापूर्वी प्रवेशासाठी ३ ते ७ जुलै ही मुदत देण्यात आली होती. राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे रस्ते बंद होणे आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित संस्थांमध्ये पोहोचणे कठीण झाले. परिणामी त्यांना निर्धारित मुदतीत प्रवेश घेणे शक्य झाले नाही. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायालयाने प्रवेशासाठी दोन दिवसांची अतिरिक्त मुदतवाढ दिली पात्र विद्यार्थ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ.संजय तांदळे यांनी केले आहे.

### केशवराव मुळे गुरुजी यांचे निधन



चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा जवळील वाढवणा येथील शिक्षक केशवराव देवराव मुळे वय ८६ यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले ते चौसाळा परिसरात बऱ्याच ठिकाणी सेवा केली त्यामुळे ते शिस्तप्रिय शिक्षक बालाघाटावरील कायदे पंडित व बागायतदार शेतकरी अशी ओळख होती त्यांच्या मागे २ मुले ३ मुली सुना नातू पड पणतू असा परिवार आहे त्यांच्या दुःखद निधनाने बालाघाटावर होत आहे त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

## ऐतिहासिक श्री खंडोबा दिपमाळ मंदिरात पर्यटकांसाठी 'जनसुविधा केंद्र' सुरू

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे आराध्य दैवत असलेल्या आणि ऐतिहासिक तसेच पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या श्री खंडोबा दिपमाळ मंदिर परिसरात भाविक व पर्यटकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या 'जनसुविधा केंद्राचे' उद्घाटन आज सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, सहाय्यक संचालक (पुरातत्त्व), विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली हे जनसुविधा केंद्र उभारण्यात आले असून, त्याचे बांधकाम व व्यवस्थापन सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

श्री खंडोबा दिपमाळ मंदिर हे बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण आहे. वर्षभर जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून हजारो भाविक आणि पर्यटक येथे दर्शनासाठी व ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी येत असतात. मात्र, त्यांच्या मूलभूत सुविधांची कमतरता दीर्घकाळ जाणवत होती.



### शौचालय व चहा-नाश्त्याची सुविधा उपलब्ध

ही गरज लक्षात घेऊन मंदिर परिसरात आधुनिक जनसुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रामध्ये पर्यटक व भाविकांसाठी स्वच्छ आणि सुसज्ज शौचालयाची सुविधा तसेच चहा व नाश्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे मंदिर परिसरात येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास अधिक सुखकर होणार असून पर्यटनालाही चालना मिळण्यास मदत होणार आहे.

मंदिर परिसरात उभारण्यात आलेले हे जनसुविधा केंद्र ऐतिहासिक वास्तूच्या सौंदर्याला साजेशी रचना आणि परिसराची स्वच्छता लक्षात घेऊन विकसित करण्यात आले आहे. यामुळे धार्मिक पर्यटनासोबतच स्वच्छता आणि पर्यटकांच्या सुविधांनाही प्राधान्य देण्यात आले आहे.

याप्रसंगी सर्व भाविक, पर्यटक व नागरिकांनी उपस्थित राहून या जनसुविधा केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन संबंधित प्रशासन व श्री खंडोबा दिपमाळ मंदिर ट्रस्ट व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.

रामनाथ खोड
कोषाध्यक्ष :- श्री खंडोबा दिपमाळ मंदिर बीड

## कोट्यवधींच्या रस्त्यांचा पहिल्याच पावसात खेळखंडोबा; खड्ड्यांमुळे प्रवाशांचे हाल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागाला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांच्या दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आलेला कोट्यवधींचा निधी पावसाच्या पहिल्याच सरींत वाहून गेल्याचे चित्र समोर आले आहे. लाखो रुपये खर्चून तयार केलेले पाटोदा-शंभरचिरा आणि पाटोदा-साकत हे रस्ते अवघ्या वर्षभरातच खड्ड्यात गेल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विकासाचा दावा अन् रस्त्यांची 'दुर्दशा'

पाटोदा ते शंभरचिरा (५ कोटी) आणि पाटोदा ते साकत (७ कोटी) या रस्त्यांसाठी शासनाने मोठा निधी खर्च केला. मात्र, या रस्त्यांची आजची अवस्था पाहता, कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट साहित्य वापरल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्यांवरील डांबर उखडले असून, जागोजागी मोठ-मोठे खड्डे पडले आहेत.

प्रवाशांचा जीव टांगणीला

अपघातांचा धोका: खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे त्यांची खोली लक्षात येत नाही, परिणामी दुचाकीस्वारांचे अपघात वाढत आहेत.

प्रवासाची कसरत: रस्त्यावरून वाहन चालवणे म्हणजे वाहनधारकांसाठी एक मोठी कसरत बनली आहे. जीव मुठीत धरूनच प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे.

नित्यनेमाची कोंडी: दोन्ही मार्गांवरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार ये-जा करतात. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे त्यांच्या वेळेचाही मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे.

केवळ वर्षभरातच रस्त्यांची चाळण झाल्यामुळे संतप्त नागरिकांनी या कामाच्या 'थर्ड पार्टी ऑडिट'ची मागणी केली आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळा अधिक तीव्र होण्यापूर्वी तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करावी आणि दोषी कंत्राटदारांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही रस्ते टिकत नसतील, तर हा करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन खड्डे बुजवावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

- स्थानिक नागरिक

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा पै. सुमितकुमार भारस्करने परकावले आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा कुस्तीपटू पै. सुमितकुमार आप्पासाहेव भारस्कर यांनी महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेत आणखी एका सुवर्ण पानाची भर पडली आहे. थायलँडमधील पटाया येथे आयोजित आशियाई कुस्ती अजिंक्यपद्ध स्पर्धा-२०२६ मध्ये यु-२० फ्रीस्टाईल ७० किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावत भारताचा तिरंगा आभिमानाने फडकवला.

अंतिम सामन्यात सुमितकुमार यांनी कझाकस्तानच्या बलाढ्य प्रतिस्पर्धाविरुद्ध आक्रमक खेळ करत १३-७ असा गुणांनी दणदणीत विजय मिळवला. संपूर्ण स्पर्धेत त्यांनी सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. अंतिम लढतीत उत्कृष्ट कौशल्य, वेगवान चालीच्या जोरावर त्यांनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक यशामुळे थायलंडच्या भूमीवर भारताचे राष्ट्रगीत दुमदुमले. भारतासाठी सुवर्णपदक जिंकत सुमितकुमार यांनी देशाचा तसेच महाराष्ट्राचा मान उंचावला आहे.



**थायलंड येथे कुस्ती मध्ये फडकवला भारताचा झेंडा**

सुमितकुमार यांच्या यशामागे अनेक वर्षांची कठोर मेहनत, नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा आहे. ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचून त्यांनी जिद्द, चिकाटी आणि समर्पणाच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

भारताच्या युवा कुस्तीपटूंनी आशियाई स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत देशाच्या पदकतालिकेत मोलाची भर घातली आहे. आगामी जागतिक स्पर्धा आणि इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही त्यांच्याकडून अशीच दमदार कामगिरी होईल, असा विशास व्यक्त केला जात आहे. पै.सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर यांच्या या ऐतिहासिक सुवर्ण कामगिरीबद्दल महाराष्ट्रासह देशाला अभिमान वाटत असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्याच्या या यशबद्दल म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे,प्रा. प्रकाश गवते,प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा.स्वप्निल टाक, क्रीडा शिक्षक प्रा. नवनाथ आवारे, प्रा.प्रविण कोरडे, प्रा.चंद्रकांत फड. यांच्यासह प्रा. संजय बागुल, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण,डॉ. सुदर्शन स्वामी,एकनाथ मस्के यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



बीड-राष्ट्रसंत तुकाराम महाराजांसह संतपरंपरेतील नैतिक, आध्यात्मिक व वैश्विक ज्ञानाची गंगोत्री कीर्तनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पूर्णपणे मोफत पोहोचविणारे, आपल्या निस्वार्थ सेवाभावी कार्यामुळे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्र्समध्ये नोंद झालेले महाराष्ट्राचे भूषण आदरणीय हरिभक्त परायण रामकृष्ण रंधवे बापू महाराज यांनी आयुष्यभर केलेल्या विनामूल्य कीर्तन सेवेबद्दल रोटरी क्लब, बीड यांच्या वतीने 'सेवागौरव पुरस्कार'मिळाल्याबद्दल त्यांच्या पाटोदा येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच बापूंचे आशिर्वाद घेतले.

## लिंबागणेश येथील 'एसआयआर' विशेष शिबिराची तहसीलदार शेळके यांनी केली पाहणी

लिंबागणेश । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर)-२०२६ अभियानांतर्गत बीड जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ ते १० जुलै या कालावधीत हे अभियान राबविण्यात येत असून बुधवारी (दि. ८) बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भरविण्यात आलेल्या विशेष शिबिराला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत मंडळ अधिकारी उज्वला राऊत, महसूल अधिकारी गणपत पोतदार, महसूल अधिकारी प्रमोद



कोळपकर, महसूल सेवक ललित काकडे उपस्थित होते

यावेळी तहसीलदार शेळके यांनी पर्यवेक्षक राजेंद्र येडे, बूथस्तरीय अधिकारी तथा सहशिक्षक दिपक घाटे आणि भालचंद्र शिक्षण संस्थेचे शिक्षक शामराव ढास , सहशिक्षिका श्रीमती अयाचित,श्रीमती सानप,श्रीमती गिते यांच्याशी संवाद साधला. प्रत्येक पात्र मतदाराचे गणना प्रपत्र अचूकपणे भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेत अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, विक्रांत वाणी, सय्यद अख्तर, समीर शेख, विनोद मोरे, अशोक थोरात, संदीप पौळ, दासू थोरात आदी उपस्थित होते.

## संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

बीड । प्रतिनिधी

शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, नगर रोड, बीड येथे विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेशांचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संजय तांदळे म्हणाले की, शिक्षण हेच जीवनातील यशाचे खरे साधन आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता चांगले संस्कार, सामाजिक जाणीव आणि मानवतेची भावना जोपासली पाहिजे.

प्रा. सुशीलाताई मोराळे यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि समाजाचे जीवन उन्नत करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक अल्ताफ शेख, निहाल शेख सर, दराडे सर, गदळे मॅडम, काझी मॅडम तसेच शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. शालेय साहित्य व गणवेश मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवे प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक अल्ताफ शेख यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दराडे सर यांनी केले.या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत झाली असून समाजातील विविध घटकांनी अशा उपक्रमांमध्ये पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## पान ६ वरुन...

### दूध भेसळ प्रकरणात

राजकीय व्यक्ती आमदार सुरेश धस यांनी उघड केलेल्या दूध भेसळ प्रकरणाची तीव्रता कमी करण्यासाठी जाणूनबुजून अपप्रचार करत आहेत. काही समाजमाध्यमे व प्रसारमाध्यमांमधून बीडमधील आमदाराची पत्नी, बड्या नेत्याची पत्नी अशा शब्दांत बातम्या प्रसिद्ध करून प्रत्यक्ष नाव न घेता संशयाची सुई आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. संबंधित पत्रकारांकडे विचारणा केली असता त्या बातमीत तुमचे नाव नाही, असे उत्तर देण्यात आले. मात्र, नाव न घेता एखाद्या व्यक्तीची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणे ही खोटे आरोप आणि दिशाभूल करणाऱ्या अफवांमुळे समाजात नैतिक अधःपतनाला खतपाणी घातले जात आहे.

पुणे जिल्ह्यातील मंचर परिसरातील एका दूध डेअरीबाबत संशयास्पद माहिती मिळाल्यानंतर त्या डेअरीची चौकशी व्हावी, यासाठी आपण स्वतः अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना संदेश पाठवून तपासाची मागणी केली होती, असे प्राजक्ता धस यांनी सांगितले. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांचे समर्थन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. उलट दोषींवर कठोर कारवाई व्हावी, हीच आमची स्पष्ट भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्राजक्ता धस यांनी पुढे दावा केला की, आष्टी दूध संघाने गुणवत्तेच्या कारणास्तव नाकारलेले दूध काही अन्य डेअऱ्यांकडून स्वीकारले जात असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या होत्या. संबंधित डेअरीकडून बल्क मिल्क कूलर (इचउ) चालक तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना तीन-तीन महिने दूध पुरवठ्याचे पैसे दिले जात नसल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. अनेक पुरवठादार आर्थिक अडचणीत सापडले असून, या संपूर्ण व्यवहाराची सखोल चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी आणि मोठे गौडबंगाल समोर येऊ शकते, असा दावाही त्यांनी केला.

ज्यांच्याकडे कोणतेही ठोस पुरावे असतील त्यांनी ते समाजमाध्यमांवर अपप्रचार करण्याऐवजी सार्वजनिक करावेत आणि संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत.

दूध भेसळ हा जनतेच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय आहे. या विषयावर राजकारण न करता कोणताही दोषी मोठा असो किंवा लहान, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र खोटे आरोप करून दूध भेसळीविरोधात लढणाऱ्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न जनतेने ओळखावा, असे आवाहन प्राजक्ता धस यांनी शेवटी केले.

### बीड जिल्हा परिषदेच्या

चव्हाण आज रुजू होताच विविध शैक्षणिक व सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आलं यावेळी महाराष्ट्र राज्य कृतिशील कर्मचारी संघटनेचे राज्य प्रसार प्रमुख तुकाराम पवार यांनी त्यांचे स्वागत केलं याप्रसंगी परीक्षा विधीन शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे उपशिक्षणाधिकारी विलास जाधव संगणक प्रोग्रामर रवींद्र रणदिवे सहायक प्रशासन अधिकारीअनंत खेडकर इत्यादी उपस्थित होते.

### पंधरा दिवसांत एकाच

अंदाजे ७७ हजार रुपयांचे साहित्य चोरट्यांनी लंपास केले आहे. एकाच शेतकऱ्याच्या शेतात अल्पावधीत दोनदा चोरी झाल्याने चोरट्यांचे धाडस वाढल्याची भावना परिसरातील शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी वर्गात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून,पोलिसांनी या प्रकरणाचा तातडीने तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा अशी मागणी शेतकऱ्यांकडुन होत आहे.

### स्वर्गीय अजितदादा पवार

सोयीसाठी ही वास्तू अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

लोकार्पण कार्यक्रमास सहाय्यक संचालिका श्रीमती जया बिहाने, स्वच्छता व आरोग्य सभापती श्री शेख निजाम, नगरसेवक खय्युम शेख, मुन्ना इनामदार, विनोद दादा हातागळे, भागवत शेठ बादाडे, श्री आकाशजी, राठोड साहेब, अजित कुमार मिश्रा, जकीउद्दीन शेख, चुन्नू खान, रिजवान खान, असलम शेख तसेच अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक संचालिका श्रीमती जया बिहाने यांनी शहेनशाहवली दर्गा परिसरातील उर्वरित विकासकामेही लवकरात लवकर दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात येतील, असे सांगितले. बीड शहरातील ऐतिहासिक व पर्यटनस्थळांचे जतन, संवर्धन आणि सुशोभीकरण करण्यासाठी शासनाकडून विविध विकासकामे हाती घेण्यात येत असून, त्यामुळे भविष्यात बीडच्या पर्यटनाला निश्चितच चालना मिळणार असल्याचा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

### पाटोदा तालुक्यात खरीप

होणारा बदल दर्शवते.

प्रमुख पिकांची पेरणी (हेक्टरमध्ये):

सोयाबीन: ३०,४४६, तूर: १,५०८, उडीद: १,२३८, कापूस: ८७८, बाजरी: ५१३, मूग: ४६५, कांदा: ८६

नगदी पिकांवर शेतकऱ्यांचा भर

यंदाच्या हंगामात कापूस आणि तुरीच्या तुलनेत सोयाबीन लागवडीचे क्षेत्र कैक पटीने जास्त आहे. पारंपरिक पिकांच्या कचाट्यातून बाहेर पडून अधिक आर्थिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांना शेतकरी प्राधान्य देत असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. उर्वरित ४८ टक्के क्षेत्रावरील पेरणीही पुढील काही दिवसांत पूर्ण होण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. पावसाचा असाच सकारात्मक प्रतिसाद राहिल्यास यंदाचे खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

cmyk

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभासाठी

# ‘ॲग्रीस्टॅक’ नोंदणी बंधनकारक

बीड : राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना आता आधार कार्ड आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल. जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट कर्ज खात्यात जमा करून शेतकरी कर्जमुक्त केले जातील. तसेच ज्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून वेळेत परतफेड केली आहे, त्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार कार्ड क्रमांक मोबाईल नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. आधार लिंक झाल्यानंतर ॲग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीनंतर मिळणारा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आपल्या पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करावा. ज्या शेतकऱ्यांकडे आधीपासूनच हा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे, परंतु त्यांनी तो अद्याप बँकेत जमा केलेला नाही, त्यांनीही तो त्वरित बँकेकडे सुपूर्द करावा. या क्रमांकाशिवाय कोणत्याही परिस्थितीत योजनेचा लाभ खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असेही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कळविले आहे.

# पावसाळ्यात ही पिके घेतल्यास होईल लाखोंचा फायदा

पावसाळा सुरू होण्यास काही दिवस उरले आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मान्सून देशातील सर्व राज्यांमध्ये पोहोचू शकतो. अशा परिस्थितीत कमी खर्चात आणि कमी वेळेत काही पिकांची लागवड करून शेतकरी मोठी कमाई करू शकतात. आज आम्ही तुम्हाला अशा तीन पिकांबद्दल सांगणार आहोत, ज्यांची लागवड पावसाळ्यात करून लाखोंचा नफा मिळवता येतो. त्याचबरोबर त्यांच्या लागवडीचा खर्चही हजारोंमध्येच असेल. या तिन्ही पिकांची काही खास वैशिष्ट्ये देखील आहेत, ज्यामुळे ते इतर पिकांपेक्षा वेगळे आहेत. नवीन शेतकरी देखील या तीन पिकांची सहजपणे लागवड करू शकतात. याशिवाय या तिन्ही पिकांवर कीड व रोगांचा प्रभावही कमी दिसून येतो.

पालक : पावसाळ्यात पालकाची लागवड खूप प्रसिद्ध आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी या हंगामात पालक पिकवून मोठी कमाई करत आहेत. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये पालकाचे भाव बाजारात गगनाला भिडलेले असतात. अशा स्थितीत शेतकरी पालक बियाणांची पेरणी जून ते जुलैपर्यंत करू शकतात. पालक तयार होण्यासाठी ४५-५० दिवस लागतात. त्यानंतर पाच ते सहा वेळा कापणी करता येते. पालकाच्या एक एकर लागवडीसाठी सुमारे १५००० रुपये खर्च येतो. त्याच वेळी, तुम्ही यातून तीन महिन्यांसाठी चांगले उत्पन्न कमवू शकता.


कोथिंबीर : पावसाळ्यात कोथिंबीरीलाही बाजारात चांगला भाव मिळतो. दुसरीकडे, कोथिंबीर पिकापासून किमान तीन वेळा पाऊस काढता येतो. त्याची लागवडही जून ते जुलै दरम्यान केली जाते. एक एकर कोथिंबिरीच्या लागवडीसाठी किमान २० हजार रुपये खर्च होतात. त्याचबरोबर शेतकऱ्यांना दोन महिन्यांत एक ते दीड लाख रुपये उत्पन्न मिळू शकते.

मेथी : पालक आणि कोथिंबीर प्रमाणेच तुम्ही पावसाळ्यात मेथीचीही लागवड करू शकता. एक एकर मेथीच्या लागवडीसाठी सुमारे १० हजार रुपये खर्च येतो. त्याचबरोबर ३० ते ४० हजार रुपयांपर्यंत कमाई होऊ शकते. पेरणीनंतर मेथीही तयार होण्यास ४५-५० दिवस लागतात. त्याचप्रमाणे या तीन पिकांची लागवड करून शेतकरी कमी खर्चात आणि कमी वेळेत भरघोस कमाई करू शकतात.



# गायीला दररोज इतके लिटर पाणी पाजा

## तुमची गाय देईल २० लिटरपर्यंत दूध!



राज्यामध्ये शेतकरी मोठ्या संख्येने दुग्ध व्यवसाय करत आहे. दुग्ध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये दूध उत्पादनात घट होणे ही सर्वात मोठी समस्या असते. विशेष म्हणजे जनावरांकडे दुर्लक्ष झाल्यास दूध उत्पादनात घट होण्यासह अनेक समस्या उद्भवतात. परिणामी, शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरांची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. यात प्रामुख्याने शेतकऱ्यांनी जनावरांच्या चाऱ्यासह त्यांच्या पिण्याच्या पाण्याकडे विशेष लक्ष देणे खूप गरजेचे असते.

दररोज किती पाणी आवश्यक? दूध व्यवसाय करताना शेतकरी प्रामुख्याने दुधाळ जनावरांच्या चाऱ्याकडे तर लक्ष देतात. मात्र, दूध उत्पादन वाढीसाठी दुधाळ गायींना चाऱ्यासोबत वेळोवेळी पाणी पाजणे देखील आवश्यक असते. गायीने अधिक दूध देण्यासाठी तिने अधिकाधिक पाणी पिणे आवश्यक असते. अर्थात एखादी गाय दररोज दोन वेळा २० लिटर दूध येत असेल. तर अशा गायीला २४ तासांमध्ये कमीत कमी १०० लिटर पाणी दिले जाणे आवश्यक आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांनी कमीत कमी तीन वेळा दुधाळ गायीला-म्हशीला पाणवठ्यावर नेणे आवश्यक असते.

चारा/पाणी यांचे प्रमाण : इतकेच नाही तर एखाद्या गायीने जर १२ किलो चारा खाल्ला असेल तर अशा गायीला तो चारा पचवण्यासाठी ५० लिटर पाण्याची आवशक्यता असते. थोडक्यात काय तर एक गाय किंवा म्हशीने दिवसभरात १०० ते १५० लिटर पाणी पिणे गरजेचे असते. जेणेकरून अशी गाय किंवा म्हैस २० लिटर दूध देण्यास सक्षम ठरते. पाणी शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरांना चारा टाकण्याचे प्रमाण आणि त्या तुलनेत पाणी पाजण्याचे प्रमाण निरीक्षणातून लक्षात घेणे आवश्यक असते.

अधिक पाणी पिण्यासाठी उपाय : सध्याच्या घडीला ग्रामीण भागात सहसा जनावरांसाठी सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या आढळतात.

दुधाळ जनावरांनी अधिकाधिक पाणी प्यावे. यासाठी शेतकऱ्यांनी या टाक्या नेहमी स्वच्छ ठेवल्या पाहिजे. किमान पंधरा दिवसांतून एकदा संपूर्ण टाकी कोरडी करून त्याला आतून चुना लावावा. त्यामुळे त्यात शेवाळ वाढणार नाही तसेच पाणी थंड राहून त्यातून कॅल्शिअमचाही थोडा पुरवठा होईल. याशिवाय गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी पाण्यात तुरटी फिरवणे सारखा सोपा उपाय करू शकतो. बाजारात पाणी स्वच्छ करण्यासाठी सॅनिटायझर टॅबलेट ही उपलब्ध आहेत. पाणी स्वच्छ असल्यास दुधाळ गायी/म्हशी अधिक पाणी पितात.

# शेळ्यांना पावसाळ्यात गवतामुळे होणारे आजार

पावसाळा हा शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा काळ असतो, कारण या हंगामात निसर्गाने दिलेली भरपूर पावसाची देणगी जमिनीत नवचैतन्य निर्माण करते. याच काळात शेताच्या बांधांवर आणि मोकळ्या जागांवर भरपूर प्रमाणात ताजं, हिरवं गवत उगवतं. अनेक शेतकरी या नैसर्गिक गवताचा उपयोग आपली शेळ्या, मेंढ्या किंवा इतर जनावरांना चारण्यासाठी करतात. कारण गवत ताजं, रसयुक्त आणि सहज उपलब्ध असतं. मात्र, यामध्ये एक मोठा धोका दडलेला असतो. ताजं गवत खरेच शेळ्यांसाठी पौष्टिक आहे का, की ते त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं? या प्रश्नाचा विचार करून योग्य काळजी घेतली गेली पाहिजे.

ताजं गवत हे पावसाळ्यात जास्त रसयुक्त असतं, त्यात पाण्याचं प्रमाण अधिक असतं आणि ते अपूर्ण वाढलेलंही असू शकतं. हे गवत जर शेळ्यांना थेट व भरपूर प्रमाणात खायला दिलं गेलं, तर त्यांच्या पचनसंस्थेवर याचा विपरित परिणाम होतो. या गवतामुळे पोटात गॅस तयार होतो, पोट फुगतं, अपचन होते आणि काही वेळा श्वास घेण्यात अडचण निर्माण होते. ही स्थिती म्हणजे ‘ब्लोट’ नावाने ओळखली जाते आणि यामध्ये वेळेवर उपचार न मिळाल्यास शेळीचा जीवही जाऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांनी गवत देताना एकदम भरपूर न देता हळूहळू प्रमाण वाढवावं.



ताज्या गवतामुळे आणखी एक धोका म्हणजे कृमिरोगाचा. पावसाळ्यात जमिनीत ओलावा असल्यामुळे विविध प्रकारचे परजीवी जसे की जंत, गोम, किड्या वगैरे सक्रिय होतात. हे परजीवी गवतासोबत शेळ्यांच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्यांच्या आतड्यांमध्ये जाऊन कृमिरोग निर्माण करतात. यामुळे शेळ्यांचे वजन कमी होणे, डोळ्यांखालचा भाग फिकट पडणे, भूक न लागणे, अशक्तपणा, केस गळणे अशी अनेक लक्षणं दिसतात. या परिस्थितीवर मात करण्यासाठी दर ३ ते ४ महिन्यांनी कृमिनाशक गोळ्या देणे अत्यंत आवश्यक आहे. ताज्या गवतावर बुरशी वाढण्याची शक्यता असते, विशेषतः ते गवत साठवून ठेवले असेल आणि हवामान दमट असेल, तर त्यावर मायकोटॉक्सिन्स तयार होतात. हे बुरशीजन्य विष शरीरात गेल्यास शेळ्यांच्या लिव्हरवर विपरित परिणाम होतो. अन्न पचवण्याची क्रिया मंदावते, विष शरीरात साठतं आणि शेळ्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. काही प्रकरणांमध्ये गर्भवती शेळ्यांमध्ये गर्भपात होण्याचाही धोका असतो.

याशिवाय, ताजं गवत जर प्रमाणाबाहेर दिलं गेलं, तर त्यात जास्त पाण्यामुळे शेळ्यांना जुलाब होऊ शकतो. सततचा जुलाब हा शरीरातील पाणी व क्षारांचं प्रमाण कमी करतो, त्यामुळे शेळ्या निर्जलित होतात, अशक्त पडतात आणि त्यांच्या शरीरवाढीवर परिणाम होतो. हे सर्व टाळण्यासाठी काही काळजी घेणं आवश्यक आहे. प्रथम, ताजं गवत थेट न देता ते थोडावेळ उन्हात वाळवून मग द्यावं. गवतावर बुरशी, काळपटपणा, वास, किंवा चिकटपणा जाणवल्यास ते गवत टाळावं. जनावरांना देण्यापूर्वी गवत नीट पाहूनच वापरावं. चाऱ्यात कोरड्या चाऱ्याचा समावेश करणे गरजेचे आहे जसे की सुकवलेले गवत, डाळींच्या कांड्या, भुसा इत्यादी. ताज्या आणि कोरड्या चाऱ्याचे संतुलन राखल्यास पचनक्रिया सुधारते.




### महत्वाच्या घटना

१८७३ : मुंबई शेअर बाजार एका वडाच्या झाडाखाली सुरू झाला.
१८७४ : इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मांजर शिरल्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबले.
१८७५ : भारतातील पहिला स्टॉक एक्सचेंज म्हणजेच मुंबई स्टॉक एक्सचेंज ची स्थापना मुंबईतील दलात स्ट्रीट येथे करण्यात आली.
१८७७ : विंबल्डन चॅम्पियनशिप सुरु झाली.
१८८९ : अमेरिकेतील प्रसिद्ध वर्तमानपत्र द वॉल स्ट्रीट चे प्रकाशन करण्यात आले.
१८९३ : डॉ. डॅनियल हेल यांनी जगातील पहिली ’ओपन हार्ट’ शस्त्रक्रिया शिकागो येथे यशस्वी केली.
१९४४ : ब्रिटीशांच्या राजवटीपासून भारताला स्वतंत्र करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व स्वीकारले.
१९५१ : भारताची पहिली पंचवार्षिक योजना प्रसिद्ध करण्यात आली.
१९६९ : वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यात आला.
१९९१ : दक्षिण आफ्रिका देशाला ऑलिम्पिकमध्ये सहभाग घेण्यास पुन्हा परवानगी मिळाली.
२००० : अमेरिकेच्या पीट सॅम्प्रसने ऑस्ट्रेलियाच्या पॅट्रिक राफ्टरचे आव्हान मोडून काढीत विम्बल्डन टेनिस स्पर्धा सातव्यांदा जिंकली. त्याबरोबरच सॅम्प्रसने आपल्या कारकिर्दीतील तेरावे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावून रॉय इमर्सन यांचा बारा ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा विक्रम मागे टाकला.
२०११ : सुदान राष्ट्रातून दक्षिण सुदान या नवीन देशाची निर्मिती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : फ्रेंच लेखक ॲलेक्सिस पिरॉन यांचा जन्म.
१७२१ : जर्मन लेखक योहान निकोलॉस गोत्झ यांचा जन्म.
१८१९ : एलियास होवे शिवणयंत्राचा संशोधक (मृत्यू: ३ आक्टोबर १८६७)
१८४५ : साली ब्रिटीश कालीन भारतातील सन १९०५-१९१० काळातील व्हाईसरॉय आणि भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मिण्टो द्वितीय यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व माजी संसदीय कार्यमंत्री तसचं, मध्यप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल सत्य नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१९२१ : रामभाऊ म्हाळगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि विधानसभेतील पहिले आमदार, तसेच भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राचे पहिले प्रादेशिक अध्यक्ष (मृत्यू: ६ मार्च १९८२)
१९२५ : वसंतकुमार शिवशंकर पदुकोण ऊर्फ ’गुरू दत्त’ प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते. त्यांचे ‘चौदहवी का चांद‘, ‘कागज के फूल‘, ‘सीआयडी‘, ‘मि. अंड मिसेस ५५‘, ‘आरपार‘ आणि ‘प्यासा‘ इ. चित्रपट लोकप्रिय ठरले. त्यांच्या ‘साहिब बिबी और गुलाम‘ या चित्रपटाला राष्ट्रपतीपदक मिळाले. (मृत्यू: १० आक्टोबर १९६४)
१९२६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ बेन मॉटलसन यांचा जन्म.
१९३० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक के. बालाचंदर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१४)
१९३८ : हरी जरीवाला ऊर्फ ’संजीव कुमार’ रुपेरी चित्रसृष्टी निखळ अभिनयाच्या जोरावर गाजवणारे कसदार अभिनेते (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८५)
१९४४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार आणि शैक्षणिक जूडिथ एम. ब्राउन यांचा जन्म.
१९५० : युक्रेन चे पंतप्रधान व्हिक्टर यानुकोविच यांचा जन्म.
१९७१ : नेटस्केप चे सहसंस्थापक मार्क अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ ऑगस्ट १७७६)
१८६५ : इटलीचे महान रसायनशास्त्रज्ञ अमेडिओ अवोगॅड्रो यांचे निधन.
१९१० : व्हिक्टोरिया क्रॉसचा प्राप्तकर्ता ब्रिटीश सैन्य अधिकारी मेजर जॉर्ज मुरे रोलँड यांचे निधन.
१९३२ : किंग कँप जिलेट अमेरिकन संशोधक व उद्योजक (जन्म: ५ जानेवारी १८५५)
१९४४ : युद्धप्रसंगी राष्ट्रकुल सैन्याला पुरविल्या जाणार्या सेवाप्रसंगी शत्रूच्या सामन्यात शौर्याचा सर्वात उच्च आणि प्रतिष्ठित पुरस्कार व्हिक्टोरिया क्रॉसचे विजेता फ्रँक गेराल्ड ब्लॅकर यांचे निधन.
१९६८ : ह. भ. प. शंकर वामन तथा ’सोनोपंत’ दांडेकर स. प. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तत्वज्ञानाचे प्राध्यापक व प्रवचनकार, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे प्रणेते (जन्म: २० एप्रिल १८९६)
१९९३ : संगीतकार व वाद्यवृंद संयोजक या सोनिक-ओमी (काका-पुतणे) जोडीतील सोनिक यांचे निधन (जन्म:)
२००५ : डॉ. रफिक झकारिया महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य (जन्म: ५ एप्रिल १९२०)
२००५ : प्रसिद्ध इराणी भाषांतरकार, संपादक, कोशकार आणि सहित्यीक समिक्षक करीम इमामी यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि.९ जुलै २०२६
५



# जिल्हा प्रशासन व ग्लोबल विकास ट्रस्टचा सामंजस्य करार

## ३ हजार शेतकऱ्यांना आर्थिक, तांत्रिक व प्रशिक्षणाचे सर्वंकष सहाय्य

जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आणि शाश्वत कृषी विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून जालना जिल्हा प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत जिल्ह्यातील ३ हजार शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी आर्थिक, तांत्रिक आणि प्रशिक्षणाचे सर्वंकष सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून, आधुनिक शेतीच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत निवड झालेल्या गावांतील शेतकऱ्यांना च्या माध्यमातून आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचबरोबर ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण, अत्याधुनिक तांत्रिक मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहनपर



सहाय्य दिले जाणार आहे. त्यामुळे रेशीम शेतीकडे पाहण्याचा शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलून ती एक सक्षम ग्रामीण उद्योगव्यवस्था म्हणून विकसित होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या उपक्रमात जिल्हा प्रशासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असणार आहे. रेशीम उद्योजक शेतकऱ्यांना पूर्वसंमती, अंदाजपत्रक तयार करणे, अनुदानासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही, प्रशिक्षण आणि विविध शासकीय प्रक्रियांचे मार्गदर्शन प्रशासनामार्फत केले जाणार असून, संपूर्ण उपक्रमावर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना नियंत्रण ठेवणार आहे.यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी सांगितले की, जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त प्रयत्नातून ३ हजार शेतकऱ्यांना या उपक्रमाचा थेट लाभ मिळणार आहे. आधुनिक आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचा हा प्रभावी प्रयत्न ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, ''देशात खरी नवक्रांती घडवायची असेल तर शेतकऱ्यांच्या प्रति एकर उत्पन्नात वाढ होणे अत्यावश्यक आहे.'' याच ध्येयाने ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, आजपर्यंत ५ हजारांहून अधिक गावे आणि ३४ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत संस्थेचे कार्य पोहोचले आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांनी केलेल्या स्वतंत्र परीक्षणात ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या उत्पादनात दहापट वाढ झाल्याचे आढळून आले असल्याचा उल्लेख त्यांनी केला. येणाऱ्या काळात हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर विस्तारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. कृषीकुल येथे झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, सनदी अधिकारी आर. रंगमंजू, प्रकल्प संचालक (आत्मा) अमोल आगवाण, उपविभागीय कृषी अधिकारी रामेश्वर रोडगे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, गजानन जंजाळ तसेच ग्लोबल विकास ट्रस्टचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर उपस्थित मान्यवरांनी सिरसाळा येथे भेट देऊन ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात १०८ किलोमीटर नद्यांचे पुनरुज्जीवन, सिरसाळा तलावाचे खोलीकरण आणि विविध जलसंवर्धन उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली.

## जिल्हा नियोजन समितीवर अजय काशीद, संध्या सोनवणे यांची वर्णी

जामखेड। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीवरील सदस्य व विशेष निमंत्रित सदस्यांची घोषणा केली असून, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सारोळ्याचे माजी सरपंच अजय काशीद यांची जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)च्या युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांची विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने ६ जुलै रोजी याबाबतचा आदेश जारी केला.

अजय काशीद यांनी भारतीय जनता युवा मोर्चाचे चिटणीस, भाजपचे जिल्हा सरचिटणीस तसेच सलग ६ वर्ष तालुकाध्यक्ष म्हणून काम केले आहे. सारोळा गावचे दहा वर्षे बिनविरोध सरपंच म्हणून काम पाहिले. त्यांनी रस्ते, भूमिगत गटारे, जलसंधारण व विविध विकासकामे राबविली.





जलयुक्त शिवार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी गावाला भेट दिली होती. तसेच 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात गावातील शाळेने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळविला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले असून, कै. विष्णुवस्ताद (बाबा) काशिद यांच्या स्मरणार्थ व नागेश्वर यात्रेनिमित्त दरवर्षी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असतो. संध्याताई सोनवणे या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)च्या युवती प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभर कार्यरत आहेत. महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास, सामाजिक प्रश्न आणि लोकहिताच्या विषयांवर त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची व विकासविषयक अनुभवाची दखल घेत त्यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दोन्ही नियुक्त्यांचे राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रांतून स्वागत करण्यात आले असून, कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला या दोन्ही नियुक्त्यांमुळे अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## उमरी फाटा येथे कर्जमाफी पीक विम्याचे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**सरकारने कर्जमाफीच्या घोषणेमध्ये अनेक अटी शर्ती टाकल्यामुळे बहुसंख्य शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहे. त्यामुळे सरसकट कर्जमाफी देऊन अतिवृष्टी मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा देण्यात यावा या मागणीसाठी शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने दि. १४ जुलै रोजी उमरद फाटा येथे आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या राक्षस भुवन व कुक्कडगाव येथील बैठकीस शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

सरकारने कर्जमाफी टाकलेल्या अटी व शर्ती रद्द कराव्यात, तसेच मागील वर्षी अतिवृष्टी मध्ये शेतकऱ्याला पीक विम्याच्या माध्यमातून हेक्टरी १७ हजार रुपये मदत देऊ अशी घोषणा केली असतांना बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा देण्यात आलेला नाही सरकारने कर्जमाफीतील अटी व शर्ती काढून शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये पिक विमा तात्काळ मंजूर करण्यात यावा, या मागणी करिता बीड – पिंपळनेर रोडवरील उमरी फाटा ( उमरद खालसा) येथे मंगळवार दि. १४ जुलै रोजी शेतकरी आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी दिली. दरम्यान कर्जमाफी व पिक विमा आंदोलनाकरिता शेतकऱ्यांच्या गावोगावी बैठका सुरू आहेत. बीड तालुक्यातील राक्षसभुवन, व कुक्कडगाव या ठिकाणी शेतकरी हक्क मोर्चाच्या उमरी येथील आंदोलनाकरिता बैठक संपन्न झाली यावेळी बैठकीत शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या बैठकीस शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, राजेश गाडे, रोहिदास मस्के, नंदू शिंदे, दीपक जाधव, राजेभाऊ कुठे महाराज देविदास वाणी, बंडू शिंदे, रामचंद्र पाटील,उमेश मस्के, शंभू देव मस्के, बालासाहेब गाडे, मुंजाजी लोणकर, चंदू नवले ,आत्माराम प्रभाळे ,यशवंत कदम,अशोक लोणकर, महादेव मस्के, सुभाष मस्के, भागवत लोणकर, आदिनाथ लोणकर, बजरंग लोणकर, भीमराव नवले , नवनाथ लोणकर, दिनकर मस्के, दिलीप पांचाळ, अरुण डफळ, लिंबाजी लोणकर, संतराम लोणकर, मनोहर मस्के, मोहन मस्के, श्रीराम मस्के, दिनकर गाडे, कल्याणराव मस्के, करण लोणकर, मदन लोणकर, भागवत पांचाळ, ज्ञानोबा मस्के सह आणि उपस्थित होते.

## महिला लोककला महोत्सवा'तून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचा रंगोत्सव

### बीड येथे ११ ते १३ जुलै दरम्यान तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सव

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने 'महिला लोककला महोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दि. ११ ते १३ जुलै २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा, लोकसंस्कृती आणि महिला लोककलावंतांच्या कलाविष्काराला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राची लोकसंस्कृती ही विविध लोककला, लोकपरंपरा, लोकसंगीत आणि लोकनृत्यांनी समृद्ध आहे. या परंपरांच्या जतन, संवर्धन आणि प्रसारामध्ये महिला कलाकारांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. पारंपरिक लोककलांमधून सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि लोकजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या या कलावंतांचा गौरव करण्यासाठी तसेच नव्या पिढीसमोर लोकसंस्कृतीचे वैभव प्रभावीपणे सादर करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

'महिला लोकरंग महोत्सव' हा महाराष्ट्रातील विविध लोककलांचा रंगतदार संगम ठरणार असून त्यामध्ये मंगळागौर नृत्य, लावणी, एकतारी भजन, भारूड, गोंधळ, मुलखावेगळी गाणी तसेच शाहिरी अशा विविध लोककला प्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. परंपरा, संस्कृती आणि लोककलेचे वैविध्य रसिकांना या महोत्सवातून अनुभवता येणार आहे. या महोत्सवामध्ये राज्यातील विविध भागांतील महिला लोककलावंत आपल्या सशक्त कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणार आहेत. लोकनृत्य, लोकसंगीत आणि पारंपरिक कलाप्रकारांच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे सौंदर्य, स्त्रीशक्तीचा सहभाग आणि लोकजीवनातील सांस्कृतिक समृद्धी प्रभावीपणे उलगडली जाणार आहे. लोककला ही समाजप्रबोधन, लोकजागृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रभावी माध्यम असून महाराष्ट्राच्या अस्मितेशी तिचे अतूट नाते आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून लोककला परंपरेचे संवर्धन, महिला कलाकारांना प्रोत्साहन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम मा. ॲड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि व्यापक प्रसार करण्याबरोबरच लोककला क्षेत्रातील महिला कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे. सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून बीड जिल्ह्यातील कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोककला महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १००१/२०२६ .**

CNR.No. MHBI0200018042026

**पार्वती नारायण जाधव व ईतर वि. निरंक**

**(मार्फत ॲड. यु. ए. काचमांडे)**

अर्जदार : १. पार्वती भ्र. नारायण जाधव, (पार्वती पि. नारायण मुळे-माहेरकडील नाव) वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. कर्झणी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात धोंडाबाई नारायण मुळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचा मृत्यु दिनांक २३/१२/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १४/०८/२०२६

आज दिनांक ०७ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर बीड

## तीन वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्यांची बदली

जालना । प्रतिनिधी

जालना तालुका दिवाणी न्यायालयातील तीन वरिष्ठ न्यायिक अधिकारी तथा क्रमांक तीन ते पाच वरिष्ठ न्यायाधीशांची जालना येथून शुक्रवार दि. ३ जुलै रोजी बदलीचे आदेश निघाले.

यामध्ये तिसरे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश करीम इकबाल खान यांची बदली बॅलार्ड पिअर, मुंबई व चौथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती छाया विक्रम सिरसाट यांची जालना येथील कामगार न्यायालयात आणि पाचवे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश जगन्नाथ जी. वाघ यांची बदली शिंदेवाडी, दादर,मुंबई येथे झाली आहे, अशी माहिती ॲड. अरविंद मुरमे यांनी दिली.

**टीसी हरवला आहे**

ईश्वर दत्तात्रय तिडके रा. पिंपरवाडा ता.धारूर जि बीड यांचा दहावी पास चा टीसी व मार्कशीट सह इतर कागदपत्र धारूर - आसरडोह बस प्रवासादरम्यान हरवले आहेत तरी कोणाला आढळून आल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

मो. क्र.७०८३५०१२१२

## आयटीआय प्रवेशासाठी ९ जुलै पर्यंत मुदतवाढ-डॉ. संजय तांदळे

बीड। प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे आयटीआय प्रवेशासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने दोन दिवसांची मदत वाढ दिली आहे. अतिवृष्टीमुळे रस्ते बंद झाल्याने आणि वाहतूक विस्कळीत झाल्याने विद्यार्थ्यांना संस्थांमध्ये जाऊन प्रवेश निश्चित केले कठीण झाले होते. ही गैरसोय लक्षात घेऊन आता विद्यार्थ्यांना ९ जुलै २०२६ गुरुवार रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करता येणार आहे. पहिल्या केंद्रीय प्रवेश फेरीत राज्यभरातील १ लाख ७० हजार ३९९ अर्जदारांपैकी ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांना प्रवेशांची संधी मिळाली. निवड झालेल्या या ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांपैकी मंगळवारी सायंकाळपर्यंत केवळ ३५ हजार ३९३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यामुळे जवळपास निम्म्याहून अधिक विद्यार्थी अद्याप प्रवेश प्रक्रिया पासून दूर आहेत. यापूर्वी प्रवेशासाठी ३ ते ७ जुलै ही मुदत देण्यात आली होती. राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे रस्ते बंद होणे आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित संस्थांमध्ये पोहोचणे कठीण झाले. परिणामी त्यांना निर्धारित मुदतीत प्रवेश घेणे शक्य झाले नाही. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायालयाने प्रवेशासाठी दोन दिवसांची अतिरिक्त मुदतवाढ दिली पात्र विद्यार्थ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ.संजय तांदळे यांनी केले आहे.

## मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांसाठी आ. रोहित पवार यांचा मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

### रस्ते, पूल व अतिरिक्त जिल्हा न्यायालयासाठी निधीची मागणी

जामखेड । प्रतिनिधी

कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात, यासाठी आमदार रोहित पवार यांनी सोमवारी विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी रस्ते, पूल आणि अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयासाठी आवश्यक निधी, प्रशासकीय मंजुरी व तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करणारी निवेदने त्यांनी मुख्यमंत्र्यांना सादर केली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मतदारसंघातील सात महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. शिंपोरा रोड, दिघी रोड, गुरव पिंपरी-थिटेवाडी, मिरजगाव-रातंजन, सावरगाव-शिऊर, डोणगाव-भवरवाडी आदी प्रमुख मार्गांसह सुमारे २७.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या रस्त्यांच्या दुरुस्तीमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित आणि सुरळीत होईल, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय, २०२५ मधील अतिवृष्टीत वाहून गेलेल्या शिंपोरा-खेड मार्गावरील नांदणी नदीच्या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत तातडीने मंजुरी व निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. पूल वाहून गेल्यापासून परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे पवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. कायमस्वरूपी पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत भारतीय लष्कराच्या अभियांत्रिकी विभागामार्फत तात्पुरता बेले ब्रिज उभारण्याबाबतही त्यांनी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अद्याप प्रलंबित असल्याचा मुद्दाही त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडला.

उच्च न्यायालयाने न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी दिली असून न्यायालयासाठी आवश्यक इमारत आणि न्यायाधीशांच्या निवासाची तयारी पूर्ण झाली आहे. केवळ निधी उपलब्ध झाल्यास न्यायालय तातडीने सुरू होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. हे न्यायालय कार्यान्वित झाल्यास कर्जत व जामखेड तालुक्यातील हजारो नागरिक, वकील आणि पक्षकारांची जिल्हा मुख्यालयापर्यंतची धावपळ कमी होऊन न्यायप्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदारसंघातील रस्ते, पूल, वाहतूक व्यवस्था आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी आ. रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. या सर्व विकासकामांना लवकर मंजुरी मिळून मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.०९ जुलै २०२६


# दूध भेसळ प्रकरणात नाव न घेता माझी बदनामी करण्याचा प्रयत्न-प्राजक्ता धस

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात दूध भेसळीविरोधात सुरू असलेल्या व्यापक कारवाईच्या पार्श्वभूमीवर काही समाजमाध्यमे व प्रसारमाध्यमांतून नाव न घेता माझ्याबाबत संशय निर्माण करणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या जात असून त्या पूर्णपणे निराधार, दिशाभूल करणाऱ्या आणि बदनामी करण्याच्या हेतूने प्रसिद्ध केल्या जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य दूध सहकारी महासंघ महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ता धस यांनी केला आहे. कोणतेही ठोस पुरावे नसताना सूचक पद्धतीने एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करणे ही पत्रकारितेच्या नैतिकतेला धरून नसल्याचे सांगत, ज्यांच्याकडे कोणतेही पुरावे असतील त्यांनी ते सार्वजनिक करावेत व संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत, अन्यथा अशा प्रकारे बदनामी करणाऱ्या बातम्या तातडीने मागे घ्याव्यात, अशी मागणी त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली.



## गेल्या पंधरा वर्षांपासून माझा मंचर येथील दूध संघ, दूध पावडर प्रकल्पाशी संबंध नाही

आष्टी तालुक्यात यापूर्वी उघडकीस आलेल्या कथित दूध भेसळ प्रकरणाचे धागेदोरे पुणे जिल्ह्यातील मंचर-आंबेगाव परिसरातील काही दूध संघांपर्यंत पोहोचत असल्याची माहिती त्यावेळी समोर आली होती. त्याचे पुढे काहीच झाले नाही.यामुळे आजही मंचर परिसरातील दूध व्यवहारांची सखोल चौकशी व्हावी, ही आमची स्पष्ट भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. दूध भेसळीविरोधात सातत्याने आवाज उठवल्यामुळेच आपल्याविरोधात अॅट्रॉसिटीचे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले, असा दावा त्यांनी केला. तसेच स्वर्गीय संतोष देशमुख प्रकरणात आमदार सुरेश धस यांनी ठाम भूमिका घेतल्यानंतरही आपल्यावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगत, समाजहिताचे प्रश्न मांडणाऱ्यांना खोट्या प्रकरणांत अडकवून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा अनुभव आम्हाला आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्राजक्ता धस म्हणाल्या की, आमदार सुरेश धस यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात दूध भेसळीविरोधात सर्वाधिक आक्रमकपणे आवाज उठवला आहे. विधानसभेत, विविध चर्चांमध्ये तसेच दुग्धविकास मंत्र्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी वारंवार दूध भेसळीचा प्रश्न उपस्थित केला. दूध भेसळीसारख्या गंभीर गुन्ह्याला आळा घालण्यासाठी कठोर कायदा करण्याचीही त्यांनी सातत्याने मागणी केली.अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा ही मागणी त्यांचीच आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची सुरुवातीपासूनची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे दावा केला की, आमदार सुरेश धस यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळेच दूध भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली असून गुन्हे दाखल होण्यास गती मिळाली आहे. मात्र, याच कारवाईची धार कमी करण्यासाठी आणि जनतेचे लक्ष मूळ मुद्द्यापासून विचलित करण्यासाठी काही राजकीय व्यक्तींकडून नियोजनबद्ध पद्धतीने अफवा पसरवल्या जात आहेत.

प्राजक्ता धस यांनी आरोप केला की, शरदचंद्र पवार पक्षाशी संबंधित काही विशिष्ट

◀◀ पान ३ वर

## बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी पदाचा पदभार श्रीमती जयश्री चव्हाण यांनी घेतला

बीड । प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमती जयश्री चव्हाण यांनी बुधवारी पदभार स्वीकारला तत्पूर्वी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांची भेट घेतली यावेळी सीओनी श्रीमती चव्हाण यांचे स्वागत केले याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी विलास जाधव ,शेख अंजुम व प्रशासनाधिकारी अनंत खेडकर उपस्थित होते

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ मधील अकरा अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्यांचे आदेश नुकतेच निर्गमित झाले छत्रपती संभाजीनगर येथील प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांची बीडच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती झाली बीड येथे श्रीमती

◀◀ पान ३ वर



## पाटोदा तालुक्यात खरीप पेरणीला वेग सोयाबीनला शेतकऱ्यांची पहिली पसंती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात मान्सूनच्या हजेरीनंतर खरीप हंगामातील पेरणीच्या कामांनी वेग घेतला आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील एकूण ६७,५३० हेक्टर पेरणीयोग्य क्षेत्रापैकी आतापर्यंत ३५,११९ हेक्टरवर म्हणजेच ५२ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. विशेष म्हणजे, यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांचा ओढा पारंपरिक पिकांकडून नगदी पिकांकडे, विशेषतः सोयाबीनकडे अधिक असल्याचे दिसून येत आहे.

सोयाबीनचा सर्वाधिक पेरा

तालुक्यातील शेतकरी यंदा सोयाबीनच्या लागवडीवर भर देत आहेत. पेरणी झालेल्या एकूण क्षेत्रापैकी तब्बल ३०,४४६ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे. हे प्रमाण एकूण पेरणी झालेल्या क्षेत्राच्या मोठा हिस्सा व्यापणारे आहे. इतर पिकांच्या तुलनेत सोयाबीनला मिळालेली ही पसंती तालुक्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत

◀◀ पान ३ वर

## पंधरा दिवसांत एकाच शेतकऱ्याच्या शेतात दोनदा चोरी ; ७७ हजार रुपयांचे साहित्य लंपास

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील शेतकरी किरण जावळे यांच्या शेतात अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत दोन वेळा विद्युत मोटर व वायर चोरीची घटना घडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


गेल्या काही दिवसांत युसूफवडगांव येथील १५/१६ शेतकऱ्यांच्या तळ्याकडील मोटरींचे वायर चोरीला गेले आहे तर काही शेतकऱ्यांचे शेतातील विहीरी वरील मोटरा व मोटरांचे वायर चोरीला गेले आहे.त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे त्यातच जांभळबेट शेत शिवारातील किरण जावळे यांच्या शेतात चोरट्यांनी दोनदा चोरी केली आहे.पंधरा दिवसापुर्वी झालेल्या पहिल्या चोरीच्या घटनेत चोरट्यांनी शेतातील विद्युत मोटारचे सुमारे २० हजार रुपये किमतीचे वायर चोरून नेले होते.त्यानंतर परवा पुन्हा त्याच शेतात चोरट्यांनी चोरी करून ७.५ एचपीची अंदाजे ३९ हजार रुपये किमतीची विद्युत मोटार तसेच सौरऊर्जा (सोलार) यंत्रणेचे सुमारे १८ हजार रुपये किमतीचे वायर लंपास केले.या दुसऱ्या घटनेत सुमारे ५७ हजार रुपयांचे नुकसान झाले असून,दोन्ही चोरीच्या घटनांमध्ये एकूण

◀◀ पान ३ वर

## सायगावात विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या; पतीसह पाच जनावर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील व बर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सायगाव येथे एका वीस वर्षाच्या नवविवातीने सासरच्या छळाला कंटाळून राहत्या घरी गाळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना दि सहा जुलै रोजी उघकिस आली आहे सततच्या पैशाची मागणी करत व शारीरिक मानसिक छळ करून आत्महत्येचे प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या प्रकरणातील फिर्यादी अब्दुल पाशामिया शेख वय ४२ वर्ष रा न्यू काझी मोहल्ला लातूर यांनी आपली मुलगी सानिया हिचे लग्न २५ मे २०२५ रोजी सायगाव येथील साजेद हमीद शेख यांच्याशी करून दिले होते लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी लोकांचे देणे देण्यासाठी माहेरून पन्नास हजार रुपये आणण्याची मागणी सानियाकडे करण्यात आली होती अब्दुल शेख यांची गरीब परिस्थिती असतानाही फिर्यादीने पन्नास हजार रुपये दिले मात्र त्यानंतरही सासरच्या लोकांनी पुन्हा पैशाची मागणी करत सानियाला सतत शिवीगाळ करून मारहाण व मानसिक त्रास देणे सुरू ठेवल्याने

सासरच्या जाचाच कंटाळून अखेर ६ जुलै २०२६ च्या दरम्यान सानियाने सायगाव येथील राहत्या घरी लोखंडी पाईप ला मफरल ने गाळफस लावून आपली जीवन यात्रा संपवली या प्रकरणातील मृत सानिया चे पती साजेद हमीद शेख,सासरे हामेद हंमजामिया शेख, वाजेद हामेद शेख सासू जबिन हामेद शेख. सर्व राहणार सायगाव तालुका अंबाजोगाई आणि नणंद शेख आयशा फिरोज मिर्झा रा,लातूर यांच्याविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात आत्महत्यास प्रवर्त करणे मारहाण व हुंड्यासाठी छळ केल्या प्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून दिनांक सात जुलै रोजी आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे या घटनेचा पुढील तपास सह पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीशकुमार सारोळे हे करीत आहेत.

## गेवराई मतदारसंघासह बीड जिल्ह्यात एस. आय. आर. मोहिमेला गती द्या -अॅड. चंद्रकांत नवले

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सघन मतदार नोंदणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत गेवराई मतदारसंघासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व बीएलए-२ यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गाव, वाडी-वस्ती आणि शहरातील नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून मतदार नोंदणी प्रक्रिया प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी केले आहे.

मतदार यादीत कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी बीएलए-२ यांनी नागरिकांच्या घरी भेटी देऊन नवीन मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नाव समाविष्ट करणे तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करून अर्ज भरण्यास मदत करावी. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि दुर्गम भागातील मतदारांना प्राधान्याने सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः गेवराई मतदारसंघात एसआयआर मोहिमेला अधिक गती देण्यासाठी प्रत्येक बूथवर नियोजनबद्ध पद्धतीने काम करणे आवश्यक असल्याचे अॅड. नवले यांनी सांगितले. कोणताही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी बूथनिहाय घरभेटी घेऊन नागरिकांना आवश्यक सहकार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले.

अॅड. नवले म्हणाले की, मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवणे ही लोकशाही बळकट करण्याची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे शिवसेनेच्या प्रत्येक बीएलए-२ यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून मतदार नोंदणीचे काम जबाबदारीने पूर्ण करावे. कोणताही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रत्येक बीएलए-२ ने जनतेपर्यंत जाऊन सक्रियपणे काम करणे आवश्यक आहे.एसआयआर मोहिमेत शिवसेनेच्या सर्व बीएलए-२ यांनी संघटनात्मक जबाबदारी समजून जनजागृती करावी, नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात आणि मतदार नोंदणीची प्रक्रिया शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करावे, असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी केले. तसेच नागरिकांनीही आवश्यक कागदपत्रांसह वेळेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

## डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील सर्व मतदारांनी विशेष सखोल पुन:रिक्षण एसआयआर मोहिमेस सहकार्य करावे – अॅड. प्रकाश कवठेकर

पाटोदा । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) मोहिमेअंतर्गत डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील सर्व पात्र मतदारांनी आपल्या मतदार नोंदी अद्ययावत करण्यासाठी आवश्यक फॉर्म वेळेत भरून द्यावेत, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य अॅड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



अॅड. प्रकाश कवठेकर यांनी सांगितले की, डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावातील मतदारांनी आपल्या शाळेतील नियुक्त बीएलओ यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेला फॉर्म भरून जमा करावा. फॉर्म भरताना कुटुंबातील संबंधित व्यक्तींचे आधार कार्ड सोबत ठेवावे. तसेच मतदार यादीतील पूर्वीचा फोटो अस्पष्ट किंवा जुना असल्यास नवीन पासपोर्ट आकाराचा फोटो जोडावा. मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असून, या कामात कोणीही निष्काळजीपणा करू नये. सर्व पात्र मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म वेळेत भरून निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन ड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

## स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कल्पनेतील बीडची विकासाकडे वाटचाल -शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्राताई पवार,आमदार विजयसिंहजी पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वर्गीय माजी आमदार विनायक मेटे साहेब यांच्या प्रयत्नाने व नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांच्या सहकार्याने स्वर्गीय अजितदादा पवार यांनी पाहिलेले विकसित आणि सुशोभित बीड आता प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीड शहरातील ऐतिहासिक व पुरातन वारसा लाभलेल्या शहेनशाहवली दर्गा परिसरात महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, सहाय्यक संचालक (विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांच्या अंतर्गत उभारण्यात आलेल्या जनसुविधा केंद्राच्या सुसज्ज इमारतीचे आज लोकार्पण करण्यात आले.

सदर जनसुविधा केंद्राचे बांधकाम व व्यवस्थापन सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑर्गनायझेशन यांच्या वतीने करण्यात आले असून, भाविक व पर्यटकांच्या

◀◀ पान ३ वर

शहेनशाहवली दर्गा परिसरातील जनसुविधा केंद्राचे( सुलभ स्वच्छालय ) लोकार्पण



## माऊली गोंडे यांच्या मृत्युस कारणीभूत ठरलेल्या कनिष्ट अभियंता कुलकर्णी यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा -ग्रामस्थांची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील तरुण शेतकरी माऊली दिलीप गोंडे यांचे रविवार दि ५ रोजी शेतात लोमकळलेल्या ताराला स्पर्श होऊन जागीच मृत्यू झाला होता.या लोमकळलेल्या तारा विषयी संबंधित महावितरणाचे कनिष्ट अभियंता पद्माकर कुलकर्णी यांना वारंवार.सुचनादेऊनही त्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याने माऊलीला जिव गमवार लागला त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी चिंचोटी ग्रामस्थांनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गजानन क्षीरसागर यांच्याकडे लेखी निवेदनातून केली आहे.




. तालुक्यातील चिंचोटी येथील तरुण शेतकरी माऊली गोंडे यांच्या घरात अठरा विश्व दारिद्र्य दोन एकर जमीन,वडिलांचे लहान असतांनीच त्यांचाही करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाला होता,माऊली लहान असतांनाच वडीलांचे छत्र हरवलेले,घरात आई आणि एक भाऊ,कसेतरी वडिलांचे दुःख बाजूला सारून हाताला मिळेल ते काम करत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.माऊली नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करत असताना त्यांच्या शेतातून गेलेल्या विद्युत तारा जमीनी पासुन ३ ते ४ फुटावर लोमकळत आसलेल्या विदुत प्रवाह आसलेल्या तारांचा स्पर्श झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. स्वतः माऊली गोंडे यांनी यापूर्वीही अनेक वेळा या धोकादायक लोमकळलेल्या तारा विषयी महावितरणाच्या ऑफीसला जाऊन तारा दुरुस्त करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी विनंती करुन सांगितले होते.संबंधीत अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने माऊलीला आपला जिव गमवावा लागला संबंधीत दोषी आसलेले कनिष्ठ अभियंता पद्माकर कुलकर्णी विरोधात ग्रामस्थांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे.त्यांच्यावर सदोष मनुष्यवराचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी एका लेखी निवेदनाद्वारे वडवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गजानन क्षीरसागर यांच्या कडे ग्रामस्थांनी केली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल न केल्यास ऊपोषण करणार आसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## परसबागेच्या उद्‌घाटनाने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जागृती

माजलगांव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मनुरवाडी (केंद्र - माजलगांव क्र.१) येथे शाळेच्या परसबागेचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



या कार्यक्रमाचे उद्घाटन राहुल सूर्यतळ,पोलीस निरीक्षक, माजलगांव यांच्या शुभहस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रमेश फपाळ हे उपस्थित होते.दि.८ जुलै बुधवार रोजी दुपारी १२:०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात राहुल सूर्यतळ यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन, स्वच्छता आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व समजावून सांगत प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक रोप लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक रमेश फपाळ यांनी परसबाग हा विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार, निसर्गप्रेम, स्वावलंबन तसेच पौष्टिक आहाराबाबत जागरूकता निर्माण करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे सांगितले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती सुनंदा पाचनकर यांनी पुढाकार घेतला. त्यांना पवार सर, युसुफ सर,खरात सर,श्रीमती मीरा तांबे मॅडम व श्रीमती संगीता कोरडे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. विमलताई हिवाळे तसेच शिक्षणप्रेमी नागरिक संतोष पवार आणि राजेभाऊ बडवणे यांनीही या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26